महात्मा गांधी विद्यामंदिर संचालित

**लोकनेते व्यंकटराव हिरे कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय**

पंचवटी नाशिक - ४२२००३

पुणे विद्यापीठ संलग्न क्र पी.यू./एन.एस/ए.एस.सी/०१८(१९७१)

(NAAC Reaccredited at **'A'** Level with CGPA 3.01)

कार्यालय: २५१२९५४ , २६२८२३३ फैक्स ( २५३) २५१२९२४

Web site : www.lvhcollege.com * E-mail: lvhcollege@gmail.com,

उत्कृष्ट संलग्न महाविद्यालय पुरस्कार २०१७, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ


Founder



Karmaveer
Bhausaheb Hiray

दिनांक ३०/०३/२०१८

# ग्रंथालय वार्षिक अहवाल २०१८-१९

"बहुजन हिताय बहुजन सुखाय" हे ब्रीद घेऊन बहुजनांचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी कठीबद्ध असलेली नाशिक जिल्ह्यातील अग्रगण्य शैक्षणिक संस्था म्हणजे महात्मा गांधी विद्यामंदिर होय. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक, सामाजिक गरजा लक्षात घेऊन संस्कृती विषयक विचार कसे प्रगल्भ होतील याकडे विषेश लक्ष दिले जाते. या सर्वांचा विचार करून महाविद्यालयातील ग्रंथालय विभाग चैतन्यशील आणि तेजस्वी ठेवण्यासाठी आम्ही सदैव प्रयत्नशील असतो. माहिती तंत्रज्ञानातील विकास व माहितीचा विस्फोट यांना सामावून घेत ग्रंथालयांना टिकून राहायचे आहे. आणि भविष्यात होणाऱ्या बद्दला कडे वाटचाल करावयाची आहे. यासाठी ग्रंथालय कसे सुसज्ज आणि परिपूर्ण होईल याकडे जास्तीत जास्त लक्ष दिले जाते. त्यासाठी कला, वाणिज्य, विज्ञान आणि बी. व्होकेशनल विषयावरील दर्जेदार पुस्तके, आत्मचरित्रे, धर्मकोश, विश्वकोश इअरबुक, डिक्शनरी, निरनिराळ्या विषयावर ग्रंथ उपलब्ध आहेत. पुस्तकांबरोबरच मासिके, नियतकालिके आणि जर्नल्स उपलब्ध आहेत. गेल्या ४८ वर्षापासून ग्रंथालय ज्ञानदानाचे पवित्र कार्य करीत आहे. या पवित्र कार्य करणाऱ्या महाविद्यालय ग्रंथालयाचा वार्षिक अहवाल सादर करतांना आनंद होत आहे. स्थापनेपासून ते आज घडीला ग्रंथालयात खालील प्रमाणे ग्रंथसंख्या उपलब्द आहे.

**ग्रंथालयात उपलब्ध असलेल्या वाचन साहित्याचा तपशिल.**

| अ.नं. | विवरण | मागील ग्रंथांची संख्या | चालू वर्षातील वाढ | एकूण |
|---|---|---|---|---|
| १ | विकत घेतलेली ग्रंथ | | | |
| | १.वरिष्ठ विभाग | ४८८२६ | २७३ | ४९०९९ |
| | २. वरिष्ठ पी.बी.एफ. | ७०५६ | १४२ | ७१९८ |
| | ३.कनिष्ठ विभाग | १४२४२ | १३ | १४२४२ |
| | ४. कनिष्ठ पी.बी.एफ.. | ४८५९ | ० | ४८५९ |
| | ५.व्यवसाय शिक्षण विभाग आणि इतर | १०७७३ | ० | १०७७३ |
| | ग्रंथसंख्या | ८५७५६ | ४१५ | ८६१७१ |
| २ | प्रबंध व लघुप्रबंध | ०५ | - | ०५ |
| ३ | नियतकालिकांचे बांधीव खंड | ५५७ | - | ५५७ |
| ४ | सीडी व डीव्हीडी | २४५ | - | २४५ |
| | एकूण | ८०७ | - | ८०७ |
| ५ | रद्दबातल ग्रंथसंख्या<br>१. वरिष्ठ विभाग<br>२. वरिष्ठ पी.बी.एफ.<br>३. कनिष्ठ विभाग | ४१६१<br>१४६८<br>३४९९ | -<br>-<br>- | ४१६१<br>१४६८<br>३४९९ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | ४. कनिष्ठ पी.बी.एफ..<br>५. व्यवसाय शिक्षण विभाग आणि इतर | २८२४<br>०२ | -<br>- | २८२४<br>०२ |
| ६ | इतर (बुक बँक/ गुणवत्ता विकास / कनिष्ठ एस. अे. एफ./ वरिष्ठ एस. अे. एफ./ एम. एस.डब्लू / के.बी.एच.इजिनि./ व्यवसाय शिक्षण मार्गदर्शन कोर्स ) | ६४५५ | -<br>- | ६४५५ |
| | एकूण | **१८४०९** | **-** | **१८४०९** |
| **ग्रंथालयात उपलब्ध असलेल्या ग्रंथांची संख्या** | | **६७७६२** | | |
| ७ | नियतकालिके<br>१. वर्गणीतून खरेदी केलेली<br>२. ई-जर्नल्स<br>३. ई-बुक्स | <br>१०१<br>२१००<br>५१०० | <br>०२<br>६०००<br>३१३५००० | <br>१०३<br>६०००<br>३१३५००० |

**ग्रंथालयातील सभासद संख्या**

| अ.नं. | ग्रंथालयातील सभासद संख्या | विद्यार्थी | शिक्षक | |
|---|---|---|---|---|
| १ | वरिष्ठ विभाग ( अनुदानित आणि विनाअनुदानित) | ३१९८ | ७२ | |
| २ | वरिष्ठ विभाग (विनाअनुदानित) पदव्युत्तर सत्र | ७८४ | | |
| ३ | कनिष्ठ विभाग ( अनुदानित आणि विनाअनुदानित) | २२४० | ३० | |
| ४ | शिक्षकेत्तर कार्मचारी( अनुदानित आणि विनाअनुदानित) | | ६२ | |
| | **ग्रंथालयातील एकूण सभासद संख्या** | ६२२२ | १६४ | |

**माहिती साक्षरतेचा उपक्रम :** माहिती तंत्रज्ञानाच्या युगात माहिती ही विविध स्वरूपात मुबलकपणे उपलब्ध होत आहे. त्या माहितीच्या प्रवाहातून नेमकी माहिती मिळविणे व ती योग्य प्रकारे वापरणे, यासाठी विशेष कौशल्याची गरज भासत आहे. अशा माहितीच्या बाबतीत चौकस असणे, साक्षर असणे गरजेचे झाले आहे. त्या उद्देशाने महाविद्यालयाचा विद्यार्थी माहिती साक्षर व्हावा यासाठी ग्रंथालयात डॉ. एस. आर. रंगनाथन आणि डॉ.ए.पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जन्मदिनी ग्रंथप्रदर्शन भरविण्यात आले. ग्रंथालय विभागात १० संगणकासह इंटरनेट सुविधा असलेली सुसज्ज प्रयोगशाळा ई-रिसोर्स च्या वापरासाठी महाविद्यालयातील विद्यार्थी संशोधक व प्राध्यापक लाभ घेतात.

**पी.बी.एफ. :-** आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या विद्यार्थासाठी ग्रंथपेढी पी.बी.एफ. या योजने अंतर्गत १७४००.०० रू. किमतीचे सुमारे १४२ ग्रंथ खरेदी करण्यात आले. या योजनेतील विद्यार्थाना २५० पुस्तके वर्षभर घरी अभ्यासासाठी देण्यात आली.

**नियतकालिके :** विविध विषयावरील ग्रंथसंख्या हे जसे ग्रंथालयातील महत्वाचे अंग आहे. त्याच प्रमाणे नियातकालिके सुद्धा ग्रंथालायाचे महत्वाचे अंग आहे. नियातकालीके हा ताज्या माहितीचा प्रवाह असतो. त्यामध्ये आद्ययावत माहिती मिळते. ही माहिती आमच्या विद्यार्थी व शिक्षकांना मिळावी म्हणून ग्रंथालयात वेगवेगळ्या विषयावरील राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील इंग्रजी, मराठी व हिंदी भाषेतील एकूण १०१ नियतकालिके आणि जर्नल्स खरेदी केली जातात. शैक्षणिक वर्षात ६००० ऑनलाईन ई-जर्नल्स आणि ३१३५००० ई-बुक्स चे दरवर्षी नूतनीकरण करून ग्रंथालय सभासदांना उपलब्द करून देण्यात येते. प्रिंट आणि ई-जर्नल्स आणि ई-बुक्स ई. करिता वर्षभरासाठी वार्षिक वर्गणी स्वरूपात वर्गणी पाठवली जाते.

**दैनिक :** शिक्षक व विद्यार्थी यांना दररोजच्या घडामोडीची माहिती मिळावी या करिता मराठी, इंग्रजी आणि हिदी भाषेतील २० दैनिक वर्तमान पेपर ग्रंथालय विभागात उपलब्ध करून देण्यात आली. त्यासाठी दरमहा रु. ३००० (तीन हजार रुपये) एवढा खर्च केला जातो.

**कात्रण सेवा** : महाविद्यालयाची प्रतिमा अधिक स्पष्ट होण्यासाठी ग्रंथालय विभागातून महाविद्यालयात राबविलेल्या उपक्रमांची माहिती किवां माहितीच्या स्वरूपातील बातमी प्रसिद्ध केली जाते. त्या प्रसिद्ध बातमीचे कात्रण सर्वांसाठी वाचावयास उपलब्ध करून दिले आहे.

**फेसबुक सेवा / वाट्सअप** : महाविद्यालात विविध शैक्षणिक उपक्रम आयोजित केली जातात त्या सर्व उपक्रमाची माहिती सोशल नेट्वर्किंगच्या माध्यमातून माहिती महाविद्यालायाच्या सोशल नेट्वर्किंग च्या माध्यमातून फेसबुकवर आणि **वाट्सअप वर** अपलोड केली जाते. जेणेकरून महाविद्यायालयाची प्रतिमा अधिक स्पष्ट होण्यास मदत होते.

**आंतर ग्रंथालयीन देवघेव सेवा :** महाविद्यालायातील विद्यार्थी व प्राध्यापकांना आपल्या विषयासंबधी पुस्तक ग्रंथालयात उपलब्द नसेल अशा वेळी खालील ग्रंथालयाचे सभासदत्व घेण्यात आले आहे.

१. डेलनेट (डेव्हलोपिंग लायब्ररी नेटवर्क ) चे सभासद, दिल्ली.

२. महात्मा गांधी विद्यामंदीर फार्मसी महाविद्यालय, नाशिक

३. महात्मा गांधी विद्यामंदीर संचलित, पंचवटी कॉलेज ऑफ मॅनेजमेंट अँड कॉम्पुटर सायन्स नाशिक

**ग्रंथालयाची सुरक्षितता** : ग्रंथालय विभागातील साहित्य सुरक्षिततेच्या दृष्टीने ग्रंथालय बिभागाचा बासस्ट लाख रुपये चा विमाचे नूतनीकरण करण्यासाठी वार्षिक प्रीमियमपोटी ३००० रू. खर्च करण्यात आली.

**देणगी निधी :** यावर्षी रत्ना निधी चॉरीटेबल ट्रस्ट, नाशिक यांच्याकडून ७० पुस्तके भेट स्वरूपात मिळाली. व डॉ. एम. एस. मोडक, नॅब पुनर्वसन केंद्र यांच्याकडून अंध विद्यार्थ्यांसाठी ब्रेलची ४२ मासिक भेट रुपात मिळाली. व तसेच मा. सौ. अनघा कुलकर्णी, नाशिक यांच्याकडून ब्रेल लिपीची ऑडीओ, व्हिडीओ डेटाबेस विनामुल्य उपलब्ध करू दिला. आपणा सर्वांचे महाविद्यालयाच्या वतीने अभिनंदन व ग्रंथालय विभागाच्या वतीने शतशः आभार!

**आभार :** महाविद्यालयाच्या ग्रंथालय विभागातील सेवा व सुविधा समृद्ध व अद्ययावत करण्यासाठी संस्थेचे विशवस्त व अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य मा. चंद्रकांत जी. दिघावकर व ग्रंथालय समितीचे सदस्य व माझे सर्व सहकारी आणि विद्यार्थी यांच्या सर्वांच्या मार्गदर्शनामुळे व सहकार्याने ग्रंथालयाची प्रगती होत आहे. मनापासून सर्वांचे आभार व्यक्त करतो.

ग्रंथालय विभाग प्रमुख

## ग्रंथालय समिती

| अं. न. | ग्रंथालय समिती सदस्य | |
|---|---|---|
| १. | प्राचार्य डॉ. सी. जी. दिघावकर | अध्यक्ष |
| २. | उपप्राचार्य डॉ. अ. व्ही. पाटील | सदस्य |
| ३. | प्रा. डॉ. एन. बी. पवार | सदस्य |
| ४. | प्रा. डॉ. विनीत एच. रकिबे | सदस्य |
| ५. | प्रा. डॉ. के. आर. निकम | सदस्य |
| ६. | प्रा. डॉ. के. एन. पिंगळे | सदस्य |
| ७. | प्रा. एस. पी. व्याळीज | सचिव |
| ८. | श्री. पी. डी. झालसे | सदस्य |
| ९. | श्री. एस. एन. शेलार | सदस्य |



“वाचन प्रेरणा” दिनाचे औचित्य साधून व भारताचे माजी राष्ट्रपती डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांचा जयंतीनिमित्त ग्रंथप्रदर्शनाच्या उद्घाटनप्रसंगी मा. प्राचार्य डॉ. सी. जी. दिघावकर यांच्या समवेत उपप्राचार्य डॉ. अरुण पाटील, ग्रंथपाल प्रा. संभाजी व्याळीज. विज्ञान शाखा प्रमुख डॉ. एन. बी. पवार, डॉ. के. एच. कापडणीस, डॉ. किशोर निकम, डॉ. मीनाक्षी पाटील यांच्यासह ग्रंथालय कर्मचारी व विद्यार्थी.




लोकनेते व्यंकटराव हिरे महाविद्यालयात भारताचे माजी राष्ट्रपती डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांचा जयंतीनिमित्त ग्रंथप्रदर्शनाचा लाभ घेताना प्राचार्य डाँ. सी. जी. दिघावकर समवेत उपप्राचार्य डॉ. अरुण पाटील, ग्रंथपाल प्रा. संभाजी व्याळीज. विज्ञान शाखा प्रमुख डॉ. एन. बी. पवार, यांच्यासह शिक्षक व विद्यार्थी.

## प्रसिद्धी समिती :

शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मध्ये प्रसिद्धी समितीने महाविद्यालया संदर्भात वर्ष भरात झालेल्या विविध उपक्रमांच्या बातम्या विविध वर्तमानपत्रातून प्रसिद्धी दिली. असुन त्या संदर्भातील काही बातम्या आपल्या अवलोकनार्थ जोडलेल्या आहेत.

प्रा. एस .पी. व्याळीज

# परखड विचारांतून कणखर नेतृत्वाची उभारणी

## पंचवटी महाविद्यालयात आयोजित राष्ट्रीयस्तरावरील आंतर महाविद्यालयीन वादविवाद स्पर्धेचे पारितोषिक वितरण

**सामाजिक कार्यकर्ते डॉ. विश्वंभर चौधरी यांचे प्रतिपादन**



**प्रतिनिधी** | नाशिक

भाषण कला समृद्ध करण्यासाठी वक्तृत्व गुण आवश्यक आहे. आवाज आणि शास्त्रीय संगीत हे दोन गुण परखड विचार मांडणाऱ्या वक्त्यामध्ये असतात. परखड विचार मांडण्यातून कणखर नेतृत्वाची उभारणी होत असते. वादविवादात सुद्धा हिंसक वाद चालून असतात. प्रत्येक व्यक्तीला अभिव्यक्ती स्वातंत्र्य आहे, म्हणून समाजात सामाजिक कार्यकर्ते व पत्रकार हे कायमच विरोधक असायला पाहिजे, असे प्रतिपादन सामाजिक कार्यकर्ते व विचारवंत डॉ. विश्वंभर चौधरी यांनी व्यक्त केले.

पंचवटी महाविद्यालयात आयोजित कर्मवीर भाऊसाहेब हिरे राष्ट्रीयस्तरावरील आंतरमहाविद्यालयीन वादविवाद स्पर्धेच्या पारितोषिक वितरण समारंभ प्रसंगी डॉ. चौधरी बोलत होते. याप्रसंगी संस्थेचे समन्वयक डॉ. अपूर्व हिरे, सहसचिव डॉ. व्ही. एस. मोरे, प्राचार्य डॉ. सी. जी. दिघावकर, डॉ. किरण पिंगळे, डॉ. अरुण पाटील, पुरुषोत्तम कडलग, डॉ. एन. बी. पवार, डॉ. विनीत रकिबे आदी मान्यवर उपस्थित होते. वाद विवाद स्पर्धेविषयीची माहिती प्राचार्य डॉ. सी. जी. दिघावकर यांनी प्रास्ताविकातून दिली. ४७ वर्षांची वैभवशाली परंपरा असलेल्या या वादविवाद स्पर्धेत दिल्ली, गुजरात, राजस्थान या राज्यांतील विद्यापीठातून व महाविद्यालयातून विद्यार्थी सहभागी झाले होते.

### स्पर्धेतील विजेते असे

वादविवाद स्पर्धेत मराठी, हिंदी, व इंग्रजी या तीन भाषांतून प्रथम येण्याचा मान नागपूर येथील आर. टी. एम. यु. कॉलेजची विद्यार्थिनी स्वाईमा अहमद हिने पटकावला. ५० हजार रुपये व सन्मानपत्र असे या पारितोषिकाचे स्वरूप आहे. तर द्वितीय क्रमांक दिल्ली येथील मुकुल सिंग चौहान याने पटकावला. त्याला २५ हजार रुपयांचे रोख पारितोषिक मिळाले. तर तृतीय क्रमांक दिल्ली येथील नबी हसन याने पटकावला. ११ हजार रुपये, प्रमाणपत्र असे पुरस्काराचे स्वरूप होते. तसेच भाषावार सादरीकरण, वक्तृत्व आणि भाषेवरील प्रभुत्व यासाठी माधुरी शर्मा, अमोल गुट्टे यांना रोख पाच हजारांच्या बक्षिसाने गौरविण्यात आले.

# रोजगार मेळाव्यातून ४१२ उमेदवारांना संधी

## १६ कंपन्यांच्या निवड प्रतिनिधींनी घेतल्या उमेदवारांच्या मुलाखती

**प्रतिनिधी । नाशिक**

जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, नाशिक आणि लोकनेते व्यंकटराव हिरे कॉलेज, पंचवटी यांच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवारी (दि. २२) झालेल्या रोजगार मेळाव्यात ४१२ उमेदवारांची प्राथमिक निवड करण्यात आली. ६२४ रिक्त पदांसाठी ८०४ रोजगार इच्छुक तरुण-तरुणी या मेळाव्यास उपस्थित होते. त्यात १६ आस्थापनांनी सहभागी होत उमेदवारांच्या मुलाखती घेतल्या.

लोकनेते व्यंकटराव हिरे महाविद्यालयात 'रोजगार व उद्योजकता मेळावा' झाला. या मेळाव्याचे उद्घाटन कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विभागाचे उपसंचालक सुनील सैंदाणे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी. एस. जगदाळे, उपप्राचार्या मृणाल भारद्वाज, सहायक संचालक संपत चाटे यांच्या उपस्थितीत झाले. कौशल्य विकास कार्यक्रम, अण्णासाहेब पाटील महामंडळाच्या योजना, रोजगार प्रोत्साहन कार्यक्रम याबाबत संपत चाटे मार्गदर्शन केले.

### आधी अनुभवसंपन्न व्हा, मग अपेक्षापूर्ती

**सध्या रोजगाराच्या क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर बदल होत असून, कौशल्य आणि अनुभवधारक उमेदवारांना मोठी मागणी आहे. यामुळे, प्रथम मिळेल ती नोकरी स्वीकारून कौशल्यधारक व अनुभवसंपन्न व्हावे. यामुळे चांगल्या ठिकाणी रोजगार प्राप्तीच्या संधी आपसूकच चालून येतील, असे आवाहन संपत चाटे यांनी केले.**

शिक्षणानंतर प्रत्येकाच्या आयुष्यात संधी येत असतात. शासन अशा रोजगार मेळाव्याच्या माध्यमातून नियमित रोजगाराच्या संधी उपलब्ध करत असून, यापुढेही असे उपक्रम राबविले जाणार असल्याचे उपसंचालक सुनील सैंदाणे यांनी सांगितले. मेळाव्यात नाशिक जिल्ह्यातील १६ नामांकित कंपन्यांच्या नियुक्ती अधिकाऱ्यांनी उपस्थित उमेदवारांच्या मुलाखती घेऊन विविध पदांसाठीच्या रिक्त जागांसाठी प्राथमिक निवड केली.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन अधिकारी एस. एम. पाटील यांनी केले. प्रा. जयमाला सोदे यांनी उपस्थितांचे आभार मानले. यावेळी शहरासह जिल्हाभरातील उमेदवारांची लक्षणीय उपस्थिती होती.

नवभारत

# उपाधि ग्रहण समारोह संपन्न



## छात्रों को मिली डिग्री

**नाशिक,** सं. पूर्व विधायक अपुर्व हिरे ने कहा कि महात्मा गांधी विद्यामंदिर संस्था के मुंबई, पुणे विद्यापीठ, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राज्यस्थान हेल्थ यूनिवर्सिटी ऐसे 5 से 7 यूनिवर्सिटी के नेतृत्व में संस्था कामकाज कर रही है.

नई तकनीक को स्वीकार करने के लिए संस्था सक्षम है, जिसे अपग्रेडेशन आधुनिकता से छात्रों के लिए कारोबारी शिक्षा शुरू की है. इसका छात्र लाभ ले हरे हैं. छात्र अपने करियर की दिशा निश्चित करने के लिए सक्षम हुए हैं. आज मिली उपाधि को मेहनत से साबित करें. वे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ व महात्मा गांधी विद्यामंदिर, नाशिक द्वारा आयोजित चतुर्थ उपाधी ग्रहण समारोह को संबोधित कर रहे थे. इस समय संस्था के उपाध्यक्ष बी. के. देवरे, सहसचिव वी. एस. मोरे, सिनेट सदस्य मोतीराम देशमुख, सिनेट सदस्य नंदू पवार, विश्वस्त प्रदीप जी. एल, दीप्ती भुतडा, सुजाता शिंदे, सत्यम पाटिल, अर्चना पाटिल, सी. सी. अहिरे, भंडारी सहित सह संस्था के सभी प्राचार्य, उपप्राचार्य, प्राध्यापक, कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित थे. भव्य शोभायात्रा, दीप प्रज्वलन, विद्यापीठ गीत आदि से पदवी ग्रहण समारोह शुरू हुआ.

Navabharat Nasik Edition
23 Feb, 2019 Page No. 4

# राज्यस्तरीय 'आविष्कार' स्पर्धेची दुसरी फेरी डिसेंबरमध्ये; ऑनलाइनचीही संधी

## नाशिकच्या विद्यार्थ्यांच्या प्रकल्पांची निवड; प्रकल्पांची यादी जाहीर

प्रतिनिधी । नाशिक

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातर्फे राज्यस्तरीय आविष्कार स्पर्धा घेतली जाते. या स्पर्धेचे स्वरूप यंदाच्या वर्षापासून बदलण्यात आले असून विद्यार्थ्यांना आपले संशोधन प्रकल्प ऑनलाइनच सादर करावे लागले. या स्पर्धेतील पहिल्या फेरीतून दुसऱ्या फेरीसाठी निवड झालेल्या प्रकल्पांची यादी विद्यापीठातर्फे संकेतस्थळावर तसेच विद्यार्थ्यांच्या लॉगीनवर उपलब्ध करून देण्यात आली आहे. तसेच विद्यापीठस्तरीय दुसरी फेरी डिसेंबर महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यात होणार असून त्याचे वेळापत्रकही लवकरच जाहीर केले जाणार आहे. या दुसऱ्या फेरीत नाशिकच्या प्रकल्पांचीही निवड झाली आहे.

राज्यस्तरीय आविष्कार स्पर्धेत भुजबळ नॉलेज सिटी संचालित मेट [illegible] मेकॅनिकल इंजिनिअरिंग विभागाच्या ८ विद्यार्थ्यांची प्रोजेक्ट स्पर्धेतील दुसऱ्या फेरीसाठी निवड झाली आहे. जागृती रासकर, सागर बोडके, अमित मैंद, शिवम राठोड यांनी संशोधन केलेल्या कोरीजन ॲण्ड मेटॅलर्जिकल इन्व्हेस्टिगेशन ऑफ सिम्पल ॲण्ड हिट ट्रिटेड डुप्लेक्स स्टेनलेस स्टील या विषयावरील प्रकल्पासाठी निवड झाली आहे. त्यांना प्रा. अमोल चौधरी व सचिन डहाके यांचे मार्गदर्शन लाभले. तर प्रतिक वाघ, अमित पवार, सचिन सोनकर, सौरभ कळंब यांनी तयार केलेल्या डिजाइन ॲण्ड फॅब्रिकेशन ऑफ बॉलिस्टिक वास्ट सेपरेटर या प्रकल्पाची या फेरीसाठी निवड झाली आहे. त्यांना सचिन काकडे यांचे मार्गदर्शन लाभले.

या विद्यार्थ्यांना प्राचार्य डॉ. व्ही. पी. वाणी व मेकॅनिकल विभागप्रमुख डॉ. एम. पी. राय यांचे मार्गदर्शन लाभले.

### पंचवटी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची निवड

महात्मा गांधी विद्यामंदिर संचालित लोकनेते व्यंकटराव हिरे महाविद्यालयातील विसावे प्रचिती, पंडित संदीपकुमार, निशा महाजन, पंकज जगताप या विद्यार्थ्यांची विद्यापीठाच्या आविष्कार स्पर्धेच्या दुसऱ्या फेरीसाठी निवड झाली आहे. त्यांना संस्थेचे सरचिटणीस डॉ. प्रशांत हिरे, समन्वयक डॉ. अपूर्व हिरे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रकांत दिघावकर, उपप्राचार्य डॉ. अरुण पाटील, विज्ञान शाखाप्रमुख डॉ. नेदू पवार, कला व वाणिज्य शाखाप्रमुख डॉ. विनीत रकिबे यांचे मार्गदर्शन लाभले.

### संशोधन संकल्पनांचे पोस्टर आवश्यक

स्पर्धेत विद्यार्थ्यांना संशोधन संकल्पनांचे पोस्टर तयार करणे व त्याद्वारे सादरीकरण करणे आवश्यक असते. या संकल्पनेची मांडणी व त्या संबंधीचा मजकूर यांचा वापर करावा लागतो. पहिल्या फेरीतून दुसऱ्या फेरीत निवडलेल्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शकांकडून सुचविण्यात आलेल्या सूचनांचा अंतर्भाव करून पोस्टर तयार करावे लागणार आहे. दुसरी फेरी डिसेंबर महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यात होणार आहे.



**पंचवटी : पुणे विद्यापीठाचे नवनियुक्त कुलसचिव डॉ. प्रफुल्ल पवार यांचे स्वागत करताना डॉ. अपूर्व प्रशांत हिरे.**

# डॉ. पवारांची हिरे महाविद्यालयास सदिच्छा भेट

पंचवटी : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. प्रफुल्ल पवार यांनी हिरे महाविद्यालयास सदिच्छा भेट दिली. संस्थेचे समन्वयक डॉ. अपूर्व प्रशांत हिरे यांनी डॉ. पवार यांचे स्वागत केले. या वेळी डॉ. प्रफुल्ल पवार यांनी विद्यापीठ स्तरावर शिक्षण क्षेत्रात होत असलेले बदल याविषयी मार्गदर्शन केले. विद्यापीठाचा काही अंशी भार उपकेंद्रामार्फत कमी करण्यासाठी पुणे विद्यापीठ कटिबद्ध असल्याचे त्यांनी या वेळी सांगितले. या वेळी संस्थेचे सहसचिव डॉ. व्ही. एस. मोरे, उपाध्यक्ष बी. के. देवरे, प्राचार्य डॉ. सी. जी. दिघावकर तसेच विविध महाविद्यालयाचे प्राचार्य उपस्थित होते.

आपलं महानगर

## थोडक्यात

# हिरे संकुलात महाराष्ट्र दिन

नाशिक ▸▸ महात्मा गांधी विद्यामंदिर संस्थेतर्फे कर्मवीर भाऊसाहेब हिरे शैक्षणिक संकुलात महाराष्ट्र दिन व कामगार दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. संस्थेचे सहसचिव प्राचार्य डॉ. व्ही. एस. मोरे प्रमुख अतिथी होते. त्यांच्या हस्ते ध्वजवंदन करण्यात आले. लोकनेते व्यंकटराव हिरे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रकांत दिघावकर यांनी संयोजन केले. मराठी विभाग प्रमुख डॉ. किरण पिंगळे यांनी प्रास्ताविक केले. याप्रसंगी महात्मा गांधी विद्यामंदिर संस्थेचे विश्वस्त, प्रशासकीय अधिकारी तथा संस्था संचालित विविध महाविद्यालयांचे प्राचार्य, संचालक, विभाग प्रमुख, प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## हिरे महाविद्यालय, पंचवटी

**पंचवटी :** महात्मा गांधी विद्यामंदिर संस्थेच्या वतीने कर्मवीर भाऊसाहेब हिरे शैक्षणिक संकुलात महाराष्ट्र दिनाच्या कार्यक्रमास संस्थेचे सहसचिव प्राचार्य डॉ. व्ही. एस. मोरे हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. त्यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. हिरे महाविद्यालय प्राचार्य डॉ. चंद्रकांत दिघावकर यांनी ध्वजारोहण केले. मराठी विभाग प्रमुख डॉ. किरण पिंगळे यांनी प्रास्ताविक केले.



# हिरे महाविद्यालय

**पंचवटी :** महात्मा गांधी विद्यामंदिर संस्थेच्या वतीने कर्मवीर भाऊसाहेब हिरे शैक्षणिक संकुलात महाराष्ट्रदिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. संस्थेचे सहसचिव प्राचार्य डॉ. व्ही. एस. मोरे हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. त्यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. कार्यक्रमाचे आयोजन लोकनेते व्यंकटराव हिरे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रकांत दिघावकर यांनी केले. मराठी विभागप्रमुख डॉ. किरण पिंगळे यांनी प्रास्ताविक केले. याप्रसंगी महात्मा गांधी विद्यामंदिर संस्थेचे विश्वस्त, प्रशासकीय अधिकारी, संस्था संचालित विविध महाविद्यालयांचे प्राचार्य, संचालक; विभागप्रमुख, प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

## विद्यार्थ्याला शिष्यवृत्ती

पंचवटी : हिरे महाविद्यालयातील संजय पाटील या दिव्यांग विद्यार्थ्यास १० हजार रुपयांची शिष्यवृत्ती देण्यात आली. या शिष्यवृत्तीचा धनादेश प्राचार्य डॉ. चंद्रकांत दिघावकर, उपप्राचार्य डॉ. अरुण पाटील, डॉ. विनीत रकिबे, प्रा. संभाजी व्याळीज, प्रा. सतीश बेडेकर, गोविंदराव देशमुख, हेल्प द ब्लाईंडचे पदाधिकारी सावकार आदींच्या उपस्थितीत देण्यात आला.

## संयुक्त महाराष्ट्र चळवळीत कर्मवीर हिरेंचे योगदान : डॉ. मोरे

पंचवटी, ता. २ : कर्मवीर भाऊसाहेब हिरे यांच्या राजकीय त्यागातून मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र उभा राहिला आहे. स्वतंत्र महाराष्ट्राच्या विकासात कर्मवीरांचे सामाजिक, राजकीय, सहकार, औद्योगिक, सांस्कृतिक व शैक्षणिक योगदान हे अनन्यसाधारण आहे. उद्याचा महाराष्ट्र कसा असेल किंवा कसा असावा ही दूरदृष्टी असणाऱ्या कर्मवीर भाऊसाहेब हिरे यांनी आधीच त्यादृष्टीने पावले उचलली होती. त्यामुळे महाराष्ट्राच्या इतिहासात कर्मवीरांचे नाव सुवर्णाक्षरांनी लिहिले गेले आहे, असे प्रतिपादन महात्मा गांधी विद्यामंदिर संस्थेचे सहसचिव प्राचार्य डॉ. व्ही. एस. मोरे यांनी बुधवारी (ता. १) केले. कर्मवीर भाऊसाहेब हिरे शैक्षणिक संकुलात महाराष्ट्र व कामगार दिन कार्यक्रम झाला. डॉ. मोरे यांच्या हस्ते ध्वजारोहण झाले. प्राचार्य डॉ. चंद्रकांत दिघावकर यांनी संयोजन केले. मराठी विभागप्रमुख डॉ. किरण पिंगळे यांनी प्रास्ताविक केले.

Nashik, Nashik-Today
03/05/2019 Page No. 6

# हिरे कॉलेजच्या विद्यार्थ्यास शिष्यवृत्ती



**नाशिक :** लोकनेते व्यंकटराव हिरे महाविद्यालयातील संजय पाटील या अंध विद्यार्थ्यास १० हजार रुपयांची शिष्यवृत्ती देण्यात आली आहे. धनादेश सुपूर्द करताना हेल्प द ब्लाईंड फाउंडेशनचे पदाधिकारी सावकार, प्राचार्य डॉ. चंद्रकांत दिघावकर, उपप्राचार्य डॉ. अरुण पाटील, डॉ. विनीत रकिब आदी उपस्थित होते.

# हिरे महाविद्यालय, पंचवटी

**पंचवटी :** महात्मा गांधी विद्यामंदिर संस्थेच्या वतीने कर्मवीर भाऊसाहेब हिरे शैक्षणिक संकुलात महाराष्ट्र दिनाच्या कार्यक्रमास संस्थेचे सहसचिव प्राचार्य डॉ. व्ही. एस. मोरे हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. त्यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. हिरे महाविद्यालय प्राचार्य डॉ. चंद्रकांत दिघावकर यांनी ध्वजारोहण केले. मराठी विभाग प्रमुख डॉ. किरण पिंगळे यांनी प्रास्ताविक केले.

# व्यंकटराव हिरे यांचे कार्य आदर्शवादी

प्राचार्य डॉ. चंद्रकांत दिघावकर यांचे जयंतीदिनानिमित्त मनोगत; विद्यार्थ्यांची उपस्थिती

प्रतिनिधी | नाशिक



[illegible]


मयूर गायकवाड यांच्यासह परिसरातील नागरिक, महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते.



पंचवटी: लोकनेते व्यंकटराव हिरे महाविद्यालयात अभिवादन प्रसंगी प्राध्यापक व विभागप्रमुख.

## व्यंकटराव हिरे महाविद्यालय

**पंचवटी :** महात्मा गांधी विद्यामंदिर संचलित, लोकनेते व्यंकटराव हिरे महाविद्यालयात प्राचार्य डॉ. दिघावकर यांच्या हस्ते प्रतिमापूजन करण्यात आले. यावेळी त्यांनी सांगितले की, बाबासाहेबांच्या जीवनात अनेक वाईट प्रसंग आले, अनेकदा विपरित परिस्थितीचा सामना त्यांना करावा लागला आहे. परंतु, बाबासाहेब कधीही डगमगले नाहीत. जगाला त्यांच्या विचारांची गरज आहे असे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मराठी विभागप्रमुख डॉ. किरण पिंगळे यांनी केले. याप्रसंगी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. अरुण पाटील, प्रा. डॉ. विनित रकिबे तसेच सर्व विभागप्रमुख, प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.



# महात्मा फुले यांच्या विचारांची समाजाला गरज : डॉ. दिघावकर

आडगाव ▶▶ महात्मा गांधी विद्यामंदिर संचालित, लोकनेते व्यंकटराव हिरे महाविद्यालयात क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांची जयंती साजरी करण्यात आली. प्राचार्य डॉ. चंद्रकांत दिघावकर यांनी महात्मा फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून त्यांच्या कार्याचा आढावा घेतला. आज महात्मा फुले यांच्या विचारांची खऱ्या अर्थाने गरज असल्याचे ते म्हणाले.

छत्रपती शिवाजी महाराज, शाहू महाराज, महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे पुरोगामी महाराष्ट्राच्या जडणघडणीतील योगदान डॉ. दिघावकर यांनी यावेळी अधोरेखित केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मराठी विभागाचे प्रमुख डॉ. किरण पिंगळे यांनी केले.

याप्रसंगी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. अरुण पाटील, सर्व विभागप्रमुख, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

# लोकनेते व्यंकटराव हिरे महाविद्यालयात मोडी लिपी वर्ग



प्रतिनिधी | नाशिक

महात्मा गांधी विद्यामंदिर संचालित, लोकनेते व्यंकटराव हिरे महाविद्यालयातील इतिहास विभाग आयोजित मोडी लिपी अभ्यासक्रम वर्गाचा समारोप झाला. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. चंद्रकांत दिघावकर प्रमुख अतिथी म्हणून मोडी लिपीतज्ज्ञ प्रा. रामनाथ रावळ उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते या वर्गातील विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले.

इतिहास समजून घ्यायचा असेल तर जुने दस्तावेज व जुनी कागदपत्रे अभ्यासणे महत्त्वाचे आहे व हे जुने दस्तावेज मोडी लिपीमध्ये लिहिले गेले आहेत. त्यामुळे असे मोडी लिपीचे अभ्यासक्रम सुरू करणे ही खरोखर अतिशय महत्त्वाची व कालसंगत बाब आहे, असे प्रतिपादन प्रा. रामनाथ रावळ यांनी केले. आपल्या अध्यक्षीय मनोगतात डॉ. दिघावकर यांनी इतिहास विभागाद्वारे सुरू असलेल्या या उपक्रमाबद्दल समाधान व्यक्त केले. मोडी लिपी अभ्यासक्रम वर्गाच्या समन्वयक इतिहास विभागप्रमुख डॉ. प्रगती मारकवार यांनी आपल्या प्रास्ताविकात उपस्थितांचे स्वागत करून गेल्या नऊ वर्षांपासून सुरू असलेल्या मोडी लिपी अभ्यासक्रमाचा लाभ शेकडो विद्यार्थ्यांनी घेतला असल्याचे सांगितले.

तसेच महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यांमध्ये या महाविद्यालयाचे विद्यार्थी मोडी लिपीची सेवा करीत असल्याचेही सांगितले. यानंतर मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले. याप्रसंगी विंचूरदळवी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रवींद्र देवरे, महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. अरुण पाटील, मराठी विभागप्रमुख डॉ. किरण पिंगळे तसेच इतिहास विभागातील प्रा. कीर्ती पगार व इतर प्राध्यापक उपस्थित होते.

Ringtone



पंचवटी : लोकनेते व्यंकटराव हिरे महाविद्यालयात मोडी लिपी अभ्यासक्रम वर्गाच्या समारोपप्रसंगी प्राचार्य डॉ. चंद्रकांत दिघावकर.

# हिरे महाविद्यालयात मोडी लिपी अभ्यासक्रम वर्गाचा समारोप

सकाळ वृत्तसेवा

पंचवटी, ता. ४ : महात्मा गांधी विद्यामंदिर संचालित लोकनेते व्यंकटराव हिरे महाविद्यालयातील इतिहास विभागातर्फे मोडी लिपी अभ्यासक्रम वर्गाचा समारोप झाला. मोडी लिपीतज्ज्ञ प्रा. रामनाथ रावळ प्रमुख पाहुणे होते. त्यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले.

प्रा. रावळ यांनी इतिहास समजून घ्यायचा असेल, तर जुने दस्तऐवज व जुनी कागदपत्रे अभ्यासणे महत्त्वाचे असल्याचे सांगितले. हे जुने दस्तऐवज मोडी लिपीत लिहिले आहेत. त्यामुळे असे अभ्यासक्रम सुरू करणे, ही खरोखर अतिशय महत्त्वाची व कालसंगत बाब आहे, असे सांगितले.

प्राचार्य डॉ. चंद्रकांत दिघावकर यांनी इतिहास विभागाद्वारे सुरू असलेल्या या उपक्रमाबद्दल समाधान व्यक्त केले व पुढील वर्षांच्या मोडी लिपी वर्गासाठी दुप्पट जागा वाढवून देण्यासाठी प्रयत्नशील असल्याचे सांगितले.

मोडी लिपी अभ्यासक्रम वर्गाच्या समन्वयक इतिहास विभागप्रमुख डॉ. प्रगती मारकवार यांनी प्रास्ताविकात उपस्थितांचे स्वागत करून या अभ्यासक्रमाचा लाभ शेकडो विद्यार्थ्यांनी घेतला असल्याचे तसेच महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यांमध्ये या महाविद्यालयाचे विद्यार्थी मोडी लिपीची सेवा करीत असल्याचेही सांगितले. यानंतर विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले. विंचूरदळवी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रवींद्र देवरे, उपप्राचार्य डॉ. अरुण पाटील, मराठी विभागप्रमुख डॉ. किरण पिंगळे, इतिहास विभागप्रमुख

सकाळ

# पंचवटी औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालयात नेक्टर नियतकालिकाचे प्रकाशन

सकाळ वृत्तसेवा



पंचवटी : महात्मा गांधी विद्यामंदिर संचालित औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालयात नेक्टर या वार्षिक नियतकालिकाचे प्रकाशन करताना प्राचार्य डॉ. राजेंद्र भांबर. शेजारी संपादकीय मंडळ.

पंचवटी, ता. ४ : महात्मा गांधी विद्यामंदिर संचालित औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालयात 'नेक्टर' वार्षिक नियतकालिकाचे प्रकाशन महाविद्यालयाच्या ऑडिटोरियम हॉलमध्ये झाले. कॉलेज डेव्हलपमेंट कमिटीतर्फे श्रीशक्ती शैक्षणिक संस्थेचे सचिव दीपक सोनवणे, महात्मा गांधी विद्यामंदिर संस्थेचे विश्वस्त डॉ. जी. एल. प्रदीप, किरण पाटील, प्राचार्य डॉ. राजेंद्र भांबर, प्रा. शुभांगी पवार आदी उपस्थित होते.

नियतकालिक 'नेक्टर' हे सेफ्टी या संकल्पनेवर आधारित असून, रस्ता सुरक्षा, पर्यावरण सुरक्षा, महिला सुरक्षा, अग्नी सुरक्षा, रसायन सुरक्षा अशा विविध विषयांवर त्या त्या क्षेत्रातील मान्यवरांनी नियतकालिकेसाठी मार्गदर्शनपर लेख लिहिले. विद्यार्थ्यांनी याच संकल्पनेवर आधारित चित्र, रांगोळी व लेख देऊन नियतकालिक अजूनच समृद्ध केले आहे. संपादक म्हणून शुभांगी पवार व सोबत विद्यार्थी संपादकीय मंडळ यांनी काम पाहिले. प्राचार्य डॉ. आर. एस. भांबर यांनी मार्गदर्शन केले. हे नियतकालिक विद्यार्थ्यांना तसेच इतर वाचकांना सुरक्षेविषयी नक्की मार्गदर्शक ठरेल, असा विश्वास संस्थेचे समन्वयक, माजी आमदार डॉ. अपूर्व हिरे यांनी व्यक्त केला.

Nashik, Nashik-Today
05/04/2019 Page No. 2

आपलं महानगर

# जलसंवर्धनाची बीजे समाजात रूजावी : दिघावकर



आडगाव ▸▸ दिवसेंदिवस भीषण पाणीटंचाई होत आहे अशावेळी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी जलसंवर्धन जल व्यवस्थापन विषयावर भित्तीचित्रे, घोषवाक्य सुभाषितांच्या माध्यमातून चांगल्या प्रकारे जनजागृती केली आहे. जलसंर्धनाची ही मोहीम केवळ विद्यार्थ्यांपुरती मर्यादीत न रहाता समाजात जलसाक्षरता पोहचणे आणि रुजणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. चंद्रकांत दिघावकर यांनी केले.

महात्मा गांधी विद्यामंदिर संचलित लोकनेते व्यंकटराव हिरे महाविद्यालयात भूगोल विभागातर्फे २२ मार्च हा दिवस आंतरराष्ट्रीय जलदिन म्हणून साजरा करण्यात आला. त्याप्रसंगी दिघावकर अध्यक्षस्थानावरून बोलत होते. कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून प्राध्यापक आबा देवरे, भूगोल विभागप्रमुख, उपप्राचार्य डॉ. अरुण पाटील, कला व वाणिज्य शाखा प्रमुख डॉ. विनीत रिकबे उपस्थित होते. भूगोल विषय विभागप्रमुख डॉ. प्रल्हाद व्याळीज यांनी प्रास्ताविक केले. यावेळी देवरे, पाटील यांनी मनोगत व्यक्त केले. भूगोल विभागामार्फत ११ ते १३ मार्च दरम्यान जलव्यवस्थापन विषयावर तीन दिवसीय भित्तीचित्र प्रदर्शन आयोजन करण्यात आले होते. प्रदर्शनात महाविद्यालयाचे २७० विद्यार्थी सहभागी झाले होते. जलव्यवस्थापन, जलसंवर्धन तसेच पाण्याचे विविध स्रोत व त्यांचे जतन यावर विद्यार्थ्यांनी भित्तीचित्रे, घोषवाक्य व सुभाषिते तयार केली होती. प्रदर्शन शेवटच्या दिवशी निवड समितीमार्फत उत्कृष्ट प्रथम, द्वितीय, तृतीय भित्तीचित्रांची निवड करण्यात आली.

प्रथम क्रमांक हेमराज मिसाळ, यज्ञेश्वर जाधव द्वितीय, तर तृतीय क्रमांक सुमित्रा गावित तसेच भारती पवार व निवृत्ती वाघ यांना उत्तेजनार्थ भेटवस्तू प्रशस्तीपत्र देवून गौरविण्यात आले. प्रा. डी. व्ही. सोनावणे, प्रा. पी. बी. दाते यांनी निवड समितीवर काम केले. सूत्रसंचालन दाते यांनी तर आभार प्रा. जी. बु. हरकर यांनी मानले.

Nashik Edition
27 Mar, 2019 Page No. 10
Powered by : eReleGo.com

सकाळ

# जलव्यवस्थापनासाठी समाजप्रबोधनास द्या प्राधान्य

## प्राचार्य डॉ. चंद्रकांत दिघावकर : हिरे महाविद्यालयात जल दिनानिमित्त कार्यक्रम

सकाळ वृत्तसेवा

पंचवटी, ता. २२ : दिवसेंदिवस पाणीटंचाई भीषण होत चालली आहे. आता पंचक्रोशीतील महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी जलसंवर्धन, जलव्यवस्थापन या विषयावर भित्तिचित्रे, घोषवाक्य व सुभाषितांच्या माध्यमातून चांगल्याप्रकारे जनजागृती केली आहे, असे प्रतिपादन लोकनेते व्यंकटराव हिरे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रकांत दिघावकर यांनी शुक्रवारी (ता. २२) येथे केले.

महात्मा गांधी विद्यामंदिर संचलित लोकनेते व्यंकटराव हिरे महाविद्यालयात भूगोल विभागातर्फे आंतरराष्ट्रीय जलदिनानिमित्त झालेल्या कार्यक्रमात ते बोलत होते. प्रा. आबा देवरे, देवळा महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. अरुण पाटील, कला व वाणिज्य शाखाप्रमुख डॉ. विनीत रकिबे आदी प्रमुख पाहुणे होते.

प्रा. आबा देवरे, उपप्राचार्य डॉ. अरुण पाटील यांनी मनोगत व्यक्त केले.



पंचवटी : जागतिक जल दिनानिमित्त लोकनेते व्यंकटराव हिरे महाविद्यालयात शुक्रवारी झालेल्या कार्यक्रमास उपस्थित प्राचार्य डॉ. चंद्रकांत दिघावकर व विजेत्या विद्यार्थ्यांसह प्राध्यापक.

दरम्यान, भूगोल विभागातर्फे ११ ते १३ मार्चदरम्यान जलव्यवस्थापन या विषयावर तीनदिवसीय भित्तिचित्र प्रदर्शन झाले. प्रदर्शनात महाविद्यालयातील २०० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. जलव्यवस्थापन, जलसंवर्धन, पाण्याचे विविध स्रोत व त्यांचे जतन यावर विद्यार्थ्यांनी भित्तिचित्रे, घोषवाक्य व सुभाषिते तयार केली होती.

प्रदर्शनाच्या शेवटच्या दिवशी निवड समितीमार्फत उत्कृष्ट प्रथम, द्वितीय व तृतीय भित्तिचित्रांची निवड करण्यात आली. यात प्रथम क्रमांक हेमराज मिसळ, द्वितीय यज्ञेश्वर जाधव, तृतीय सुमित्रा गावित, भारती पवार व निवृत्ती वाघ या विद्यार्थ्यांना उत्तेजनार्थ स्मृतिचिन्ह व प्रशस्तिपत्र देऊन गौरविण्यात आले. प्रा. डी. व्ही. सोनवणे व प्रा. पी. बी. दाते यांनी निवड समितीवर काम केले. भूगोल विभागप्रमुख डॉ. प्रल्हाद व्याळीज यांनी प्रास्ताविक केले. प्रा. प्रदीप दाते यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. जी. यू. हरकर यांनी आभार मानले. कार्यक्रम यशस्वितेसाठी प्रा. एस. पी. धात्रक, प्रा. पी. बी. दाते व सुभाष मांडवडे यांनी सहकार्य केले.

Nashik, Nashik Today
23/03/2019 Page No. 4

कल्प करण्यात आले...
क्रमांतून जलदिन साजरा झाला. जलदिनानिमित्त पाण्याची ... पाण्याचा अपव्यय होणार नाही

# हिरे महाविद्यालयात भित्तिचित्र प्रदर्शन



नाशिक । महात्मा गांधी विद्यामंदिर संचलित लोकनेते व्यंकटराव हिरे महाविद्यालयात भूगोल विभागातर्फे आंतरराष्ट्रीय जलदिन साजरा करण्यात आला. प्राचार्य डॉ. चंद्रकांत दिघावकर यांनी पाणी नियोजन करण्याचे आवाहन केले. प्रा. आबा देवरे, भूगोल विभागप्रमुख, देवळा महाविद्यालय, उपप्राचार्य डॉ. अरुण पाटील, कला व वाणिज्य शाखाप्रमुख डॉ. विनीत रकिबे उपस्थित होते. भूगोल विभागप्रमुख डॉ. प्रल्हाद व्याळीज यांनी प्रास्ताविक केले. प्रमुख अतिथी प्रा. आबा देवरे, उपप्राचार्य डॉ. अरुण पाटील यांनी आपले मनोगत व्यक्त केले. भूगोल विभागामार्फत ११ ते १३ मार्चदरम्यान 'जलव्यवस्थापन' या विषयावर तीन दिवसीय भित्तिचित्र प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. जलव्यवस्थापन, जलसंवर्धन तसेच पाण्याचे विविध स्त्रोत व त्यांचे जतन यावर विद्यार्थ्यांनी भित्तिचित्रे, घोषवाक्य व सुभाषिते तयार केली होती. प्रथम क्रमांक हेमराज मिसळ, द्वितीय यज्ञेश्वर जाधव, तृतीय सुमित्रा गावित तसेच भारती पवार व निवृत्ती वाघ. प्रा. डी. व्ही. सोनवणे व प्रा. पी. बी. दाते यांनी निवड समितीवर काम केले. सूत्रसंचालन प्रा. प्रदीप दाते यांनी केले. प्रा. जी. यू. हरकर यांनी आभार मानले. यशस्वितेसाठी डॉ. पी. वाय. व्याळीज, प्रा. जी. यू. हरकर, प्रा. डी. व्ही. सोनवणे, प्रा. एस. पी. धात्रक, प्रा. पी. बी. दाते व सुभाष मांडवडे यांनी परिश्रम घेतले.

भाविक यावेळी उपस्थित होते.

# हिरे महाविद्यालयात जलव्यवस्थापनावर भित्तिचित्र प्रदर्शन



येथील महात्मा गांधी विद्यामंदिर संचलित लोकनेते व्यंकटराव हिरे महाविद्यालयात भूगोल विभागामार्फत जलव्यवस्थापन या विषयावर भित्तिचित्र प्रदर्शन सुरू आहे. बुधवारी ( दि. १३ ) दुपारी ४ वाजेपर्यंत हे प्रदर्शन खुले राहणार आहे. प्रदर्शनाचे उद्घाटन उपप्राचार्य डॉ. अरुण पाटील यांचे हस्ते झाले. यावेळी डॉ. नंदू पवार, डॉ. सुचेता सोनवणे, गोविंदराव देशमुख, किशोर इंगळे, डॉ. प्रल्हाद व्याळीज, डॉ. रवींद्र देवरे उपस्थित होते. यात २७० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. यातून प्राचार्य डॉ. चंद्रकांत दिघावकर यांच्या हस्ते या विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात येणार आहे. या प्रदर्शनासाठी प्रा. जी. यू. हरकर, प्रा. डी. व्ही. सोनावणे, प्रा. एस. पी. धात्रक, प्रा. श्रीमती कविता घाटे, प्रा. प्रदीप दाते, सुभाष मांडवडे यांनी विशेष परिश्रम घेतले.

Lokmat Times

# 'Water Management' exhibition at LVH

**LOKMAT NEWS NETWORK**
**NASHIK, MAR 11**

A two-day'Water Management was held at Vyankatrao Hiray Arts, Science and Commerce College. The exhibition was inaugurated at the hands of the Vice Principal, Prof.Dr. Arun Patil along with the chief guests ,Prof. Dr. Nandu Pawar (Science faculty in-charge), Prof. Dr. Suchita Sonawane (supervisor, Jr.college),Govind Deshmukh (office superintend) and Kishor Hingde.Principal, Dr.Ravindra Deore of Arts Science and commerce Vichor Dadvi College paid a special visit to the exhibition.

The head Department of Geography, Prof. Dr.Prahlad Vyalij welcomed the guests and delivered the introductory speech. In his speech, he highlighted the significance of water management and how best we can conserve water to prevent drought-like situations across the nation.

Students made colourful posters with thought provoking slogans in the exhibition. In the exhibition, around 270 students have participated enthusiastically.



Nashik First
Page No. 3 Mar 12, 2019
Powered by: erelego.com

# सृष्टीच्या सर्जनाची, सृजनाची देणगी स्त्रीलाच



प्रतिनिधी । नाशिक

महात्मा गांधी विद्यामंदिर संचलित लोकनेते व्यंकटराव हिरे महाविद्यालयात जागतिक महिला दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात एम.बी.ए. महाविद्यालयाच्या संचालिका डॉ. स्वाती खैर यांनी आपले मनोगत व्यक्त केले. त्या पुढे असेही म्हणाल्या की, स्त्रीची रूपे वर्णावी तेवढी कमीच आहेत. राणी लक्ष्मीबाई.. ताराबाई.. आनंदीबाई जोशी.. इंदिराजी.. कल्पना चावला इत्यादी पैलूपाल.. सुंदर असा अनेक कर्तृत्ववान स्त्रियांचे दाखले डॉ. खैर यांनी दिले.

महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. अरुण पाटील यांनी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान भूषविले. आपल्या अध्यक्षीय मनोगतात ते म्हणाले की, कुटुंबाच्या निरामय आरोग्याची दक्षता घेणारी अन्नपूर्णा असते स्त्री, कुटुंबातील आनंद ठरणारी लक्ष्मी असते स्त्री, कुटुंबासाठी समर्पण करणारी असते स्त्री, नंदनवनाचे शिल्पकार असते स्त्रीच. तसेच आपल्या जीवनात आलेल्या स्त्रियांप्रति कृतज्ञता व्यक्त करीत सर्व माता-भगिनींना महिला दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रकांत दिघावकर यांनी महिला दिनानिमित्त शुभेच्छा व्यक्त केल्या. कार्यक्रमाचे आयोजन व सूत्रसंचालन इतिहास विभागप्रमुख डॉ. प्रगती मारकवार यांनी केले.

आपलं महानगर

# हिरे महाविद्यालयात करिअर मार्गदर्शन

## कॅम्पस ड्राइव्ह : मुलाखतींद्वारे विद्यार्थ्यांची निवड

वार्ताहर ▸▸ आडगाव

am car e am

लोकनेते व्यंकटराव हिरे महाविद्यालयातील करिअर कॉन्सिलिंग आणि प्लेसमेंट सेल तसेच करिअर क्लब कन्सल्टंन्सी अँड मॅनेजमेन्ट सर्व्हिसेस, नाशिक यांच्या संयुक्त विद्यमाने लोकनेते व्यंकटराव हिरे महाविद्यालयात रोजगार मेळावा पार पडला. मेळाव्यापूर्वी उपस्थित उमेदवारांना करिअर गाइडन्स तसेच मुलाखतीबाबत व्याख्यानाद्वारे मार्गदर्शन करण्यात आले.

या मेळाव्यात नामांकित विविध क्षेत्रातील कंपन्यांनी विद्यार्थ्यांना रोजगारासाठी संधी उपलब्ध करून दिली होती. यात नाशिक, औरंगाबाद, पुणे येथील कंपन्यांचा सहभाग होता. या कंपन्यांच्या प्रतिनिधींनी विद्यार्थ्यांच्या मुलाखती घेऊन निवड प्रक्रिया पार पडली. मेळाव्यात महाविद्यालयातील कला, वाणिज्य, बी. व्होकेशनल व विज्ञान शाखेतील पदवी आणि पदव्युत्तर या विषयातील उपलब्ध असलेल्या विविध नोकरीच्या संधींसाठी मुलाखती घेतल्या. मेळाव्याचे उद्घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सी. जी. दिघावकर यांच्या अध्यक्षतेखाली आणि करिअर क्लब कन्सल्टंसी अँड मॅनेजमेंट सर्व्हिसेसच्या संचालिका प्रीती पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले. प्राचार्य डॉ. दिघावकर यांनी उपस्थित कंपनी प्रतिनिधींचे स्वागत करून विद्यार्थ्यांना मुलाखतीसाठी शुभेच्छा दिल्या. प्रास्ताविकात करिअर क्लब कन्सल्टंसी अँड मॅनेजमेंटच्या संचालिका प्रीती पाटील यांनी कॅम्पस इंटरव्ह्यूसंबंधी उमेदवारांना मार्गदर्शन केले.

करिअर काऊंसलिंग प्लेसमेंट सेलचे समन्वयक प्रा. अनिल पाटील यांनी सूत्रसंचालन केले. समिती सदस्य प्रा. एस. पी. व्याळीज, विंचूर दळवी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रवींद्र देवरे, उपप्राचार्य डॉ. अरुण पाटील, कला व वाणिज्य शाखाप्रमुख डॉ. विनीत रकिबे, प्रा. रवींद्र वाघचौरे यांसह विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

(पान १ वरून)

यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले.



आपलं महानगर दि. ५/३/१९

# हिरे महाविद्यालयात काव्यवाचन

आडगाव ▸▸ महात्मा गांधी विद्यामंदिर संचालित, लोकनेते व्यंकटराव हिरे महाविद्यालयात मराठी राजभाषा दिनी काव्यवाचन स्पर्धा पार पडली. अनेक विद्यार्थ्यांनी स्वरचित कविता उपस्थितांना सादर केल्या. शेती, शेतकरी, राष्ट्रभक्ती, प्रेम, सामाजिक विषयावर विद्यार्थ्यांनी कविता सादर केल्या. प्राचार्य डॉ. चंद्रकांत दिघावकर यांनी मराठी विषय घेऊन विविध स्पर्धा परीक्षांना सामोरे जाण्याविषयी आवाहन केले. मातृभाषेतून घेतलेल्या ज्ञानात्मक शिक्षणाची शिदोरी ही आयुष्यभर पुरणारी असते, असेही प्राचार्य दिघावकर म्हणाले. याप्रसंगी विंचुर दळवी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रवींद्र देवरे, उपप्राचार्य डॉ. अरुण पाटील, कला व वाणिज्य शाखाप्रमुख डॉ. विनीत रकीबे, डॉ. नरेंद्र देशमुख डॉ. किशोर निकम, डॉ. प्रगती मारकवार, प्रा. किर्ती पगार, प्रा. सीताराम मुरकुटे, विभागप्रमुख, प्राध्यापक व विद्यार्थी उपस्थित होते. प्रास्ताविक मराठी विभागप्रमुख डॉ. किरण पिंगळे यांनी केले, तर आभार प्रा. ललित राऊत यांनी मानले.

नाशिक, शनिवार, २ मार्च २०१९ | २

# कर्मवीर हिरे सहकार, शिक्षण क्षेत्रातील विकासाचे प्रणेते

प्रतिनिधी | नाशिक

सहकार तत्त्वाच्या माध्यमातून विकासाचा ध्यास घेत कर्मवीर भाऊसाहेब हिरे यांनी समाजकारण केले. जागतिकीकरणाच्या काळातही सहकार तत्त्वाचे हे महत्त्व वेळोवेळी अधोरेखित होत आहे. शुक्रवार (दि. १) भाऊसाहेब हिरे यांची ११४ वी जयंती साजरी करण्यात आली. याप्रसंगी प्राचार्य डॉ. सी. जी. दिघावकर यांनी सांगितले की, दुर्बल समाजाच्या उत्कर्षासाठी महत्त्वपूर्ण ठरलेल्या सहकार चळवळीसाठी कर्मवीर हिरे यांनी दिलेल्या योगदानाचा आढावा घेतला. तसेच जमीनदारी व सावकारशाहीमुळे नाडलेला शेतकरी आणि उत्पन्नाची खात्रीची साधने नसलेला दरिद्री कष्टकरी समाज यांचे दुःख भाऊसाहेब हिरे यांनी जवळून बघितले होते. ते स्वतः शेतकरी असल्यामुळे ग्रामीण समाजाची आर्थिक दुर्दशा तसेच त्या मागची कारणे त्यांना अवगत होती. शिक्षण क्षेत्रातील विकासाचे प्रणेते म्हणजे कर्मवीर भाऊसाहेब हिरे होय, असेही ते म्हणाले. नेहरू गार्डन येथील कर्मवीर भाऊसाहेब हिरे यांच्या पुतळ्याला प्राचार्य डॉ. दिघावकर यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी प्राचार्य डॉ. रवींद्र देवरे, उपप्राचार्या डॉ. अरुण पाटील, विज्ञान शाखाप्रमुख डॉ. एन. बी. पवार, कला व वाणिज्य शाखाप्रमुख डॉ. विनीत रकिबे, उपप्राचार्य प्रा. पी. डी. झालसे, प्रा. एन. जे. सोनवणे, पर्यवेक्षिका प्रा. सुचिता सोनवणे आदी उपस्थित होते.

# मराठी विषय घेऊन उज्ज्वल भवितव्य घडविता येते : डॉ. दिघावकर

■ पंचवटी । दि.२८ वार्ताहर

महात्मा गांधी विद्यामंदिर संचालित, लोकनेते व्यंकटराव हिरे महाविद्यालयात मराठी राजभाषा दिन काव्यवाचन स्पर्धा आयोजित करून साजरा करण्यात आला. अनेक विद्यार्थ्यांनी आपल्या स्वरचित कविता सादर करून उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. शेती, शेतकरी, राष्ट्रभक्ती, प्रेम तसेच सामाजिक विषयावर विद्यार्थ्यांनी आपल्या कविता सादर केल्या.



आपल्या अध्यक्षीय मनोगतात प्राचार्य डॉ. चंद्रकांत दिघावकर यांनी मराठी विषय घेऊन विविध स्पर्धा परीक्षांना सामोरे जाण्याविषयी आवाहन केले. मातृभाषेतून घेतलेल्या ज्ञानात्मक शिक्षणाची शिदोरी ही आयुष्यभर पुरणारी असते, असेही प्राचार्य दिघावकर म्हणाले. याप्रसंगी विंचुर दळवी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रवींद्र देवरे, उपप्राचार्य डॉ. अरूण पाटील, कला व वाणिज्य शाखाप्रमुख डॉ. विनीत रकीबे, डॉ. नरेंद्र देशमुख डॉ. किशोर निकम, डॉ. प्रगती मारकवार, प्रा. कीर्ती पगार, प्रा. सीताराम मुरकुटे, विभाग प्रमुख, प्राध्यापक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मराठी विभाग प्रमुख डॉ. किरण पिंगळे यांनी केले तर आभार प्रा. ललित राऊत यांनी मानले.

देशभरातील १५० स्पर्धकांचा सहभाग

# भाऊसाहेब हिरे वाद-विवाद स्पर्धेत नागपूरची स्वाईमा अहमद विजेती

प्रतिनिधी, नाशिक

**महात्मा गांधी** विद्यामंदिर संचालित पंचवटीतील लोकनेते व्यंकटराव हिरे महाविद्यालयात आयोजित कर्मवीर भाऊसाहेब हिरे राष्ट्रीय आंतरमहाविद्यालयीन वादविवाद स्पर्धेत नागपूर येथील आर. टी. एम. यू. महाविद्यालयाची स्वाईमा अहमद ही विजेती ठरली.

स्वाईमाला ५० हजार रुपये आणि सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले. २५ हजार रुपयांचा द्वितीय पुरस्कार दिल्ली येथील जामियामिला विद्यापीठातली मुकुल सिंघने, तर तृतीय स्थान याच विद्यापीठातील नवी हसनने मिळविला. त्यास ११ हजार रुपये आणि प्रमाणपत्र देण्यात आले. याशिवाय भाषा सादरीकरण, वक्तृत्व आणि भाषेवरील प्रभुत्व यासाठी हिंदीकरिता माधुरी शर्मा (एम.एस.जी.महाविद्यालय, मालेगाव), मराठीसाठी अमोल गुट्टे (एच.पी.टी. नाशिक) यांना रोख पाच



नाशिक येथील कर्मवीर भाऊसाहेब हिरे आंतरमहाविद्यालयीन वाद-विवाद स्पर्धेतील विजेत्यांसह सामाजिक कार्यकर्ते विश्वंभर चौधरी आणि संस्थेचे पदाधिकारी

हजार रुपये देऊन गौरविण्यात आले. स्पर्धेचा विषय 'भारतीय लोकशाहीस जातिआधारित राजकारण घातक आहे' हा होता. या स्पर्धेत देशभरातून १५० स्पर्धकांनी सहभाग घेतला.

पारितोषिक वितरण सामाजिक कार्यकर्ते विश्वंभर चौधरी यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले. या वेळी चौधरी यांनी भाषण कला समृद्ध करण्यासाठी वक्तृत्व गुण आवश्यक असल्याचे सांगितले. आवाज आणि शास्त्रीय संगीत हे दोन गुण खऱ्या वक्त्यात असावेत. आवाज पंचमापर्यंत पोहोचला पाहिजे. कारण आवाज म्हणजे भौतिकशास्त्र आहे. यात समाज माध्यमांचा सर्रास वापर टाळावा. वाद-विवादातही हिंसक वाद सुरूच असतात. प्रत्येक व्यक्तीला अभिव्यक्तिस्वातंत्र्य आहे. त्यामुळे समाजात सामाजिक कार्यकर्ते आणि पत्रकार हे कायमच विरोधक असायला पाहिजे. जातीला कोणताही आधार नाही. जात हे भारताचे वास्तव आहे, असे चौधरी यांनी मांडले. वाद-विवाद स्पर्धेच्या प्रकल्पाची माहिती प्राचार्य डॉ. सी. जी. दिघावकर यांनी प्रास्ताविकातून दिली. देशातील ४७ वर्षांची वैभवशाली परंपरा असलेली भारतातील ही एक अग्रणी वादविवाद स्पर्धा असून दिल्ली, गुजरात, राजस्थानातील विद्यार्थीही स्पर्धेत सहभागी झाले होते, असे त्यांनी सांगितले. परीक्षक म्हणून महाराष्ट्र साहित्य मंडळाचे सदस्य डॉ. पुरुषोत्तम काळे, डॉ. योगेश पाटील, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील मराठी अभ्यास मंडळाचे डॉ. भास्कर ढोके यांनी दोन दिवस स्पर्धेचे मूल्यमापन केले. व्यासपीठावर संस्थेचे समन्वयक डॉ. अपूर्व हिरे, सहसचिव डॉ. व्ही. एस. मोरे, प्राचार्य दिघावकर, डॉ. किरण पिंगळे, डॉ. अरुण पाटील, पुरुषोत्तम कडलग, डॉ. एन. बी. पवार, डॉ. विनीत रकिबे आदी उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रा. रवी हिरे यांनी केले. आभार डॉ. किरण पिंगळे यांनी मानले.

---

## नवभारत

दार्शनिक चौधरी के विचार

# जाति व्यवस्था यह देश का वास्तव

**नाशिक,** सं. सामाजिक कार्यकर्ता और विचारवान विश्वंबर चौधरी ने कहा कि भाषण कला समृद्ध करने के लिए वक्तृत्व गुण आवश्यक है. हिंसकता कम से कम रहे. आवाज और शास्त्रीय संगीत यह दो गुण सही मायने में वक्ता में जरूरी है. आवाज पंचमा तक पहुंचना चाहिए, क्योंकि आवाज यानी की भौतिकशास्त्र है. फेसबुक-वाट्स एप का उपयोग न करें. वाद-विवाद में भी हिंसक वाद होते हैं. हर एक व्यक्ति को अभिव्यक्ति स्वतंत्र है, इसलिए समाज में सामाजिक कार्यकर्ता और पत्रकार आवश्यक है. जाति



■ इस समय संस्था के समन्वयक अपूर्व हिरे, सह सचिव वी. एस. मोरे, प्राचार्य सी. जी. दिघावकर, किरण पिंगले, अरुण पाटिल, पुरुषोत्तम कडलग, एन. बी. पवार, विनीत रकिबे सहित सह विभाग प्रमुख, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी बड़ी संख्या में उपस्थित थे. प्राचार्य सी. जी. दिघावकर ने प्रास्ताविक किया. परीक्षक के रूप में महाराष्ट्र साहित्य मंडल के सदस्य पुरुषोत्तम काले, योगेश पाटिल, मराठी अभ्यास मंडल सा. फु. पुणे विद्यापीठ के भास्कर डोके ने काम किया.

---

# विकास की राजनीति करें : पवार



वादविवाद प्रतियोगिता के उद्घाटन समारोह किया संबोधित

# राष्ट्रीय आंतरमहाविद्यालयीन वादविवाद स्पर्धेचे उद्घा

**कोणार्कनगर । दि. २३**

महात्मा गांधी विद्यामंदीर संचलित लोकनेते व्यंकटराव हिरे महाविद्यालयाच्या वतीने आयोजित आंतर- महाविद्यालयीन राष्ट्रीय वाद विवाद स्पर्धेचे उद्घाटन थाटात झाले. जातीभेद न करता सामाजिक सलोखा राखण्यासाठी विकासाचे राजकारण करावे, असे बारामती अग्रो लिमिटेडचे रोहित पवार यांनी सांगितले. उद्घाटन प्रतिमा पूजन आणि दीप प्रज्वलनाने करण्यात आले. याप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून रोहित पवार बोलत होते. संस्थेचे समन्वयक डॉ. अपूर्व प्रशांत हिरे, सहसचिव डॉ. व्ही. एस. मोरे, प्राचार्य डॉ. सी. जी. दिघावकर, राष्ट्रवादीचे प्रदेश




सरचिटणीस अर्जुन टिळे, जिल्हा अध्यक्ष पुरुषोत्तम कडलग व आकाश पगार उपस्थित होते.

स्पर्धेचे अध्यक्ष डॉ. अपूर्व हिरे यांनी कर्मवीरांचा जीवनपट सांगितला. पारितोषिक वितरण समारोपासाठी सामाजिक कार्यकर्ते डॉ. विश्वंभर चौधरी तसेच महात्मा गांधी विद्यामंदीर संस्थेचे सरचिटणीस डॉ. प्रशांत

दादा हिरे, स
डॉ. अद्व
राहणार आ
प्राचार्य
हस्ते मान्
डॉ. नरेंद्र
परिचय क
योगेश प
आहेत.
मारकवा
स्पर्धेचे
मानले
पाटील
पवार
विनीत



# ‘पदवीला मेहनतीने द्या यशाची जोड’

**आडगाव ▸▸** करिअरची दिशा ठरवण्यासाठी तुम्ही सक्षम बनले आहात. आज प्राप्त केलेल्या या पदवीला मेहनतीने यशाची जोड देऊन आपलं भविष्य उज्ज्वल घडवा, असे प्रतिपादन डॉ. अपूर्व हिरे यांनी केले.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ व महात्मा गांधी विद्यामंदिर नाशिक आयोजित चतुर्थ पदवीग्रहण समारंभात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी संस्थेचे उपाध्यक्ष बी. के. देवरे होते, तर व्यासपीठावर सहसचिव डॉ. व्ही. एस. मोरे, सिनेट सदस्य डॉ. मोतीराम देशमुख, सिनेट सदस्य डॉ. नंदू पवार, विश्वस्त डॉ. जी. एल. प्रदीप, दीप्ती भुतडा, सुजाता शिंदे, सत्यम पाटील, अर्चना पाटील, सी. सी. अहिरे, भंडारी आदींसह संस्थेचे सर्व प्राचार्य उपस्थित होते.

यावेळी पदवीप्राप्त विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते पदवी प्रदान करण्यात येऊन गौरविण्यात आले. संस्थेचे सहसचिव डॉ. मोरे यांनी प्रास्ताविक केले. प्रा. मीनाक्षी पाटील यांनी सूत्रसंचालन व विश्वस्त डॉ. बापूसाहेब जगदाळे यांनी आभार मानले. यावेळी सर्व उपप्राचार्य, प्राध्यापक कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जाती व्यवस्था हे भारताचे वास्तव




## डॉ. विश्वंभर चौधरी : हिरे महाविद्यालयात वादविवाद स्पर्धेचा समारोप

**पंचवटी :** भाषण कला समृद्ध करण्यासाठी वक्तृत्व गुण आवश्यक असून, आवाज व शास्त्रीय संगीत हे दोन गुण खऱ्या वक्त्यात असायला हवेत. वादविवाद करताना दोन वक्ते आपसात हिंसक वाद करताना दिसत असतात. जातीला कोणताही आधार नसून, जात, धर्म, वंश हे दिवसागणिक उत्क्रांत होत असल्याने, जात हे भारताचे वास्तव असल्याचे प्रतिपादन सामाजिक कार्यकर्ते तथा विचारवंत विश्वंभर चौधरी यांनी केले. लोकनेते व्यंकटराव हिरे महाविद्यालयामध्ये आयोजित राष्ट्रीय पातळीवरील आंतरमहाविद्यालयीन वाद - विवाद स्पर्धेच्या पारितोषिक वितरण समारंभात ते बोलत होते.

याप्रसंगी संस्थेचे समन्वयक डॉ. अपूर्व हिरे, सहसचिव डॉ. व्ही. एस. मोरे, प्राचार्य डॉ. सी. जी. दिघावकर, डॉ. किरण पिंगळे, डॉ. अरुण पाटील, पुरुषोत्तम कडलग, डॉ. एन. बी. पवार, डॉ. विनीत रकिबे उपस्थित होते. ४७ वर्षे जुन्या असलेल्या या वाद विवाद स्पर्धेत दिल्ली, गुजरात, राजस्थान यासह राज्यातील पुणे, नागपूर, औरंगाबाद, मुंबई विद्यापीठांतील व महाविद्यालयांतील सुमारे १५० स्पर्धकांनी 'भारतीय लोकशाहीस जाती आधारित राजकारण घातक आहे' या विषयावर विचार मांडले.

या वाद-विवाद स्पर्धेत नागपूर येथील आरटीएमयू या महाविद्यालयातील स्वाइमा अहमद हिने प्रथम क्रमांक पटकावला. द्वितीय क्रमांक दिल्लीच्या जामिया मिलिया विद्यापीठाचा विद्यार्थी मुकुल सिंग चौहान याने, तर तृतीय क्रमांक याच महाविद्यालयाचा नवी हसन याने पटकावला. त्यांना अनुक्रमे ५० हजार, २५ हजार व ११ हजार रुपये व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. यावेळी तीनही भाषांत प्रत्येकी ५ स्पर्धकांना गौरविण्यात आले. या स्पर्धेचे परीक्षण महाराष्ट्र साहित्य मंडळाचे सदस्य डॉ. पुरुषोत्तम काळे, डॉ. योगेश पाटील, मराठी अभ्यास मंडळ सदस्य तथा सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे डॉ. भास्कर ढोके यांनी केले. प्रा. रवी हिरे यांनी सूत्रसंचालन केले, तर डॉ. किरण पिंगळे यांनी आभार मानले.

# 'निधी' करणार प्रजासत्ताकदिनी महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व

**कोणार्कनगर । दि. २३ वार्ताहर**



महात्मा गांधी विद्या मंदिर संचालित, लोकनेते व्यंकटराव हिरे महाविद्यालयातील एन. सी. सी. ची विद्यार्थिनी ज्युनिअर अंडर ऑफिसर निधी बाजीराव देवरे हिची ७ महाराष्ट्र बटालियन मधून राष्ट्रीय पातळीवर नवी दिल्ली येथे प्रजासत्ताक दिनासाठी सांस्कृतिक कार्यक्रमात निवड झाली आहे.

२६ जानेवारी प्रजासत्ताकदिनी लेझीम पथक महाराष्ट्राचे प्रतिनिधीत्व करणार आहे. निधी या विद्यार्थिनीस ७ महाराष्ट्रबटालियनचे कमांडिंग ऑफिसर कर्नल कुशवाह, प्रशासकीय अधिकारी ले. कर्नल शिंदे, सुभेदार अफजल पाशा, मनोहर पाटील, प्राचार्य डॉ. चंद्रकांत दिघावकर, उपप्राचार्य अरुण पाटील, विज्ञान शाखाप्रमुख डॉ. एन.बी. पवार, प्रा. मेजर डी. एस. शिंदे, एन. सी. सी. विभाग प्रमुख सचिन सोनवणे व पालकांचे मार्गदर्शन लाभले. तिच्या या निवडीबद्दल संस्थेचे जनरल सेक्रेटरी डॉ. प्रशांत हिरे, समन्वयक आमदार डॉ.अपूर्व हिरे,डॉ. अद्वय हिरे, शिक्षक व शिक्षकेत्तर सेवकांनी अभिनंदन केले.

# परखड विचारांतून कणखर नेतृत्वाची उभा

## पंचवटी महाविद्यालयात आयोजित राष्ट्रीयस्तरावरील आंतर महाविद्यालयीन वादविवाद स्पर्धेचे प

### सामाजिक कार्यकर्ते डॉ. विश्वंभर चौधरी यांचे प्रतिपादन

प्रतिनिधी | नाशिक




भाषण कला समृद्ध करण्यासाठी वक्तृत्व गुण आवश्यक आहे. आवाज आणि शास्त्रीय संगीत हे दोन गुण परखड विचार मांडणाऱ्या वक्त्यामध्ये असतात. परखड विचार मांडण्यातून कणखर नेतृत्वाची उभारणी होत असते. वादविवादात सुद्धा हिंसक वाद चालूच असतात. प्रत्येक व्यक्तीला अभिव्यक्ती स्वातंत्र्य आहे, म्हणून समाजात सामाजिक कार्यकर्ते व पत्रकार हे कायमच विरोधक असायला पाहिजे, असे प्रतिपादन सामाजिक कार्यकर्ते व विचारवंत डॉ. विश्वंबर चौधरी यांनी व्यक्त केले.

पंचवटी महाविद्यालयात आयोजित कर्मवीर भाऊसाहेब हिरे राष्ट्रीयस्तरावरील आंतरमहाविद्यालयीन वादविवाद स्पर्धेच्या पारितोषिक वितरण समारंभ प्रसंगी डॉ. चौधरी बोलत होते. याप्रसंगी संस्थेचे समन्वयक डॉ. अपूर्व हिरे, सहसचिव डॉ. व्ही. एस. मोरे, प्राचार्य डॉ. सी. जी. दिघावकर, डॉ. किरण पिंगळे, डॉ. अरुण पाटील, पुरुषोत्तम कडलग, डॉ. एन. बी. पवार, डॉ. विनीत रकिबे आदी मान्यवर उपस्थित होते. वाद विवाद स्पर्धेविषयीची माहिती प्राचार्य डॉ. सी. जी. दिघावकर यांनी प्रास्ताविकातून दिली. ४७ वर्षाची वैभवशाली परंपरा असलेल्या या वादविवाद स्पर्धेत दिल्ली, गुजरात, राज्यस्थान या राज्यांतील विद्यापीठातून व महाविद्यालयातून विद्यार्थी सहभागी झाले होते.

### स्पर्धेतील विजेते असे

वादविवाद स्पर्धेत मराठी, हिंदी, व इंग्र
येण्याचा मान नागपूर येथील आर. टी.
स्वाईमा अहमद हिने पटकावला. ५०
या पारितोषिकाचे स्वरूप आहे. तर द्वि
मुकुल सिंग चौहान याने पटकावला.
पारितोषिक मिळवले. तर तृतीय क्रम
याने पटकावला. ११ हजार रूपये, प्र
होते. तसेच भाषावार सादरीकरण, व
यासाठी माधुरी शर्मा, अमोल गुट्टे य
गौरविण्यात आले.

# जाती व्यवस्था हे भारताचे वास्तव




## डॉ. विश्वंभर चौधरी : हिरे महाविद्यालयात वादविवाद स्पर्धेचा समारोप

पंचवटी : भाषण कला समृद्ध करण्यासाठी वक्तृत्व गुण आवश्यक असून, आवाज व शास्त्रीय संगीत हे दोन गुण खऱ्या वक्त्यात असायला हवेत. वादविवाद करताना दोन वक्ते आपसात हिंसक वाद करताना दिसत असतात. जातीला कोणताही आधार नसून, जात, धर्म, वंश हे दिवसागणिक उत्क्रांत होत असल्याने, जात हे भारताचे वास्तव असल्याचे प्रतिपादन सामाजिक कार्यकर्ते तथा विचारवंत विश्वंभर चौधरी यांनी केले. लोकनेते व्यंकटराव हिरे महाविद्यालयामध्ये आयोजित राष्ट्रीय पातळीवरील आंतरमहाविद्यालयीन वाद - विवाद स्पर्धेच्या पारितोषिक वितरण समारंभात ते बोलत होते.

याप्रसंगी संस्थेचे समन्वयक डॉ. अपूर्व हिरे, सहसचिव डॉ. व्ही. एस. मोरे, प्राचार्य डॉ. सी. जी. दिघावकर, डॉ. किरण पिंगळे, डॉ. अरुण पाटील, पुरुषोत्तम कडलग, डॉ. एन. बी. पवार, डॉ. विनीत रकिबे उपस्थित होते. ४७ वर्षे जुन्या असलेल्या या वाद विवाद स्पर्धेत दिल्ली, गुजरात, राजस्थान यासह राज्यातील पुणे, नागपूर, औरंगाबाद, मुंबई विद्यापीठांतील व महाविद्यालयांतील सुमारे १५० स्पर्धकांनी 'भारतीय लोकशाहीस जाती आधारित राजकारण घातक आहे' या विषयावर विचार मांडले.

या वाद-विवाद स्पर्धेत नागपूर येथील आरटीएमयू या महाविद्यालयातील स्वाइमा अहमद हिने प्रथम क्रमांक पटकावला. द्वितीय क्रमांक दिल्लीच्या जामिया मिलिया विद्यापीठाचा विद्यार्थी मुकुल सिंग चौहान याने, तर तृतीय क्रमांक याच महाविद्यालयाचा नवी हसन याने पटकावला. त्यांना अनुक्रमे ५० हजार, २५ हजार व ११ हजार रुपये व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. यावेळी तीनही भाषांत प्रत्येकी ५ स्पर्धकांना गौरविण्यात आले. या स्पर्धेचे परीक्षण महाराष्ट्र साहित्य मंडळाचे सदस्य डॉ. पुरुषोत्तम काळे, डॉ. योगेश पाटील, मराठी अभ्यास मंडळ सदस्य तथा सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे डॉ. भास्कर ढोके यांनी केले. प्रा. रवी हिरे यांनी सूत्रसंचालन केले, तर डॉ. किरण पिंगळे यांनी आभार मानले.

# सामाजिक सलोख्यासाठी विकासाचे राजकारण हवे



पंचवटी । वार्ताहर । जातीभेद न करता सामाजिक सलोखा राखण्यासाठी विकासाचे राजकारण करावे असे प्रतिपादन बारामती ऍग्रो लिमिटेड चे कार्यकारी अधिकारी रोहित पवार यांनी केले. महात्मा गांधी विद्यामंदिर संचलित, लोकनेते व्यंकटराव हिरे महाविद्यालयाच्या वतीने आयोजित आंतर- महाविद्यालयीन राष्ट्रीय वाद विवाद स्पर्धेच्या उद्घाटन प्रसंगी प्रमुख अतिथी व वक्ते म्हणून ते बोलत होते . वाद विवाद स्पर्धेचे उद्घाटन प्रतिमा पुजन आणि दीप प्रज्वलनाने करण्यात आले. याप्रसंगी व्यासपीठावर समन्वयक डॉ. अपूर्व प्रशांत हिरे, सहसचिव डॉ. व्ही. एस. मोरे, प्राचार्य डॉ. सी. जी. दिघावकर, राष्ट्रवादीचे प्रदेश सरचिटणीस श्री. अर्जुन टिळे, पुरुषोत्तम कडलग व आकाश पगार उपस्थित होते.

पुढे मार्गदर्शनपर विचार व्यक्त करतांना पवार म्हणाले की , यांनी वाद विवाद स्पर्धा हे सामाजिक, सांस्कृतिक ,आर्थिक व राजकीय स्तरावर संवाद साधण्याचे चांगले व्यासपीठ आहे असेहि त्यांनी स्पष्ट केले. त्यात कुठलेही क्षेत्र असेल दुर्लक्ष करून चालणार नाही. त्या क्षेत्राकडे संधी म्हणून बघावे. प्रगती साधायची असेल तर बहुभाषिक विषयावर संवाद साधने महत्वाचे असते. आणि म्हणून लोकशाही मध्ये संविधान महत्वाचे आहे. समाजकारण करतांना राजकारण समजून घेणे महत्वाचे असते. राजकारण जातीवादी असेल तर सामाजिक सलोखा राखणे कठीण असते. म्हणून राजकारण करतांना व्यक्ती कुठल्याही पक्षांची किंवा कुठल्याही धर्माची असेल त्याचे राजकारण विकासासाठी असेल तर त्याच्या पाठीशी आपण भक्कमपणे उभे राहणे महत्वाचे असते. विकासासाठी जातीभेद चालणार नाही तर एकीचा विचार करा. कर्मवीरांनी समाजकारण करताना राजकारणाचा उपयोग हा विकासासाठी केला.

बहुजनांच्या उद्धारासाठी त्यांनी शिक्षण क्षेत्र, सहकार क्षेत्र व कृषी क्षेत्रात खुप मोठे काम केले आहे. आपले स्वप्न पूर्ण करायचे असेल तर अपारकष्ट करणे महत्वाचे आहे असेही पवार म्हणाले. वादविवाद स्पर्धेचे अध्यक्ष डॉ. अपूर्व हिरे यांनी ज्यांच्या नावाने हि वाद विवाद स्पर्धा आयोजित केली आहे. अशा थोर कर्मवीरांचा जीवनपटच सांगितला व स्पर्धा आयोजनाचा हेतू स्पष्ट केला. विकासाचे राजकारण करण्यासाठी कर्मवीर भाऊसाहेब यांनी मुख्यमंत्रीपद सुद्धा दुसऱ्याला बहाल केले. मोरारजीभाई देसाई पासून तर यशवंतराव चव्हाण पर्यंतच्या भाऊसाहेबांचा इतिहास उलगडून सांगतला व जाता जाता स्पर्धक विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.

या स्पर्धेसाठी देशभरातून च्या आसपास स्पर्धक सहभागी झाले आहेत. पारितोषिक वितरण समारोपासाठी डॉ. विश्वंभर चौधरी (सामाजिक कार्यकर्ते) तसेच महात्मा गांधी विद्यामंदिर संस्थेचे सरचिटणीस डॉ. प्रशांत दादा हिरे, समन्वयक डॉ. अ[illegible] अद्वय प्रशांत हिरे-पाटील, हे उपस्[illegible]

प्राचार्य डॉ. सी.जी. दिघावकर य[illegible] सत्कार करण्यात आला. डॉ. नरेंद्र[illegible] पाहुण्यांचा परिचय करून दिला. प[illegible] डॉ.पुरुषोत्तम काळे, डॉ. योगेश पाटी[illegible] हे दोन दिवस काम पाहणार आहेत.

डॉ. रवींद्र हिरे आणि डॉ. प्र[illegible] सूत्र संचालन केले. तर आभार स[illegible] किरण पिंगळे यांनी मानले. याप्रसंगी[illegible] पाटील विज्ञान शाखा प्रमुख डॉ. ए[illegible] वाणिज्य शाखा प्रमुख डॉ. विनीत र[illegible] कारी, प्राचार्य विभागप्रमुख, पत्रकार[illegible] महाविद्यालयांतून आलेले स्पर्धक,[illegible] कर्मचारी, व विद्यार्थी मोठ्या संख्ये[illegible]

# परखड विचारांतून कणखर नेतृत्वाची उभारणी

## पंचवटी महाविद्यालयात आयोजित राष्ट्रीयस्तरावरील आंतर महाविद्यालयीन वादविवाद स्पर्धेचे परितोषिक वितरण

### सामाजिक कार्यकर्ते डॉ. विश्वंभर चौधरी यांचे प्रतिपादन

प्रतिनिधी | नाशिक




भाषण कला समृद्ध करण्यासाठी वक्तृत्व गुण आवश्यक आहे. आवाज आणि शास्त्रीय संगीत हे दोन गुण परखड विचार मांडणाऱ्या वक्त्यामध्ये असतात. परखड विचार मांडण्यातून कणखर नेतृत्वाची उभारणी होत असते. वादविवादात सुद्धा हिंसक वाद चालूच असतात. प्रत्येक व्यक्तीला अभिव्यक्ती स्वातंत्र आहे, म्हणून समाजात सामाजिक कार्यकर्ते व पत्रकार हे कायमच विरोधक असायला पाहिजे, असे प्रतिपादन सामाजिक कार्यकर्ते व विचारवंत डॉ. विश्वंभर चौधरी यांनी व्यक्त केले.

पंचवटी महाविद्यालयात आयोजित कर्मवीर भाऊसाहेब हिरे राष्ट्रीयस्तरावरील आंतरमहाविद्यालयीन वादविवाद स्पर्धेच्या पारितोषिक वितरण समारंभ प्रसंगी डॉ. चौधरी बोलत होते. याप्रसंगी संस्थेचे समन्वयक डॉ. अपूर्व हिरे, सहसचिव डॉ. व्ही. एस. मोरे, प्राचार्य डॉ. सी. जी. दिघावकर, डॉ. किरण पिंगळे, डॉ. अरुण पाटील, पुरुषोत्तम कडलग, डॉ. एन. बी. पवार, डॉ. विनीत रकिबे आदी मान्यवर उपस्थित होते. वाद विवाद स्पर्धेविषयीची माहिती प्राचार्य डॉ. सी. जी. दिघावकर यांनी प्रास्ताविकातून दिली. ४७ वर्षांची वैभवशाली परंपरा असलेल्या या वादविवाद स्पर्धेत दिल्ली, गुजरात, राज्यस्थान या राज्यांतील विद्यापीठातून व महाविद्यालयातून विद्यार्थी सहभागी झाले होते.

### स्पर्धेतील विजेते असे

वादविवाद स्पर्धेत मराठी, हिंदी, व इंग्रजी या तीन भाषांतून प्रथम येण्याचा मान नागपूर येथील आर. टी. एम. यु. कॉलेजची विद्यार्थिनी स्वाईमा अहमद हिने पटकावला. ५० हजार रुपये व सन्मानपत्र असे या पारितोषिकाचे स्वरूप आहे. तर द्वितीय क्रमांक दिल्ली येथील मुकुल सिंग चौहान याने पटकावला. त्याला २५ हजार रुपयांचे रोख पारितोषिक मिळवले. तर तृतीय क्रमांक दिल्ली येथील नवी हसन याने पटकावला. ११ हजार रुपये, प्रमाणपत्र असे पुरस्काराचे स्वरूप होते. तसेच भाषावार सादरीकरण, वक्तृत्व आणि भाषेवरील प्रभुत्व यासाठी माधुरी शर्मा, अमोल गुट्टे यांना रोख पाच हजारांच्या बक्षिसाने गौरविण्यात आले.

लोकमत

# सामाजिक सलोख्यासाठी विकासाचे राजकारण करावे

## रोहित पवार : राष्ट्रीय वादविवाद स्पर्धेचे उद्घाटन

लोकमत न्यूज नेटवर्क

**पंचवटी** : समाजकारण करताना राजकारण समजावून घेतले पाहिजे. राजकारण जातीयवादी असल्यास जातीय सलोखा राखणे कठीण असते.राजकारण विकासासाठी असल्यास त्याच्या पाठीशी ठामपणे उभे राहिले पाहिजे असे प्रतिपादन बारामती ॲग्रो लिमिटेडचे कार्यकारी अधिकारी रोहित पवार यांनी केले. लोकनेते व्यंकटराव हिरे महाविद्यालयातर्फे आयोजित आंतर-महाविद्यालयीन राष्ट्रीय वाद विवाद स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते.

अध्यक्षस्थान संस्थेचे समन्वयक डॉ. अपूर्व हिरे, यांनी भूषविले. व्यासपीठावर सहसचिव डॉ. व्ही. एस. मोरे, प्राचार्य डॉ. चंद्रकांत दिघावकर, अर्जुन टिळे, पुरुषोत्तम कडलग, आकाश पगार उपस्थित होते. यावेळी पवार म्हणाले की, वादविवाद स्पर्धा सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, आर्थिक स्तरावर संवाद साधण्याचे व्यासपीठ आहे. कुठलेही क्षेत्र असले तरी दुर्लक्ष करुन चालत नाही. त्याकडे संधी म्हणून बघा. प्रगती साधण्यासाठी बहुभाषिक विषयावर संवाद साधावा, असे आवाहनही त्यांनी केले.

अपूर्व हिरे यांनी कर्मवीरांचा जीवनपट सांगत स्पर्धा आयोजनाचा हेतू स्पष्ट केला. मोरारजी देसाई ते यशवंतराव चव्हाण यांच्यापर्यंतच्या भाऊसाहेबांचा इतिहास सांगितला.प्रास्ताविक दिघावकर यांनी तर सूत्रसंचालन डॉ. प्रगती मारकवार, डॉ. रवि हिरे यांनी केले. स्पर्धेसाठी देशातून १५० स्पर्धक सहभागी झाले आहे. डॉ. नरेंद्र देशमुख यांनी पाहुण्यांचा परिचय करुन दिला परीक्षक म्हणून डॉ.पुरु षोत्तम काळे, डॉ. योगेश पाटील, डॉ. भास्कर डोके यांनी काम बघितले. यावेळी उपप्राचार्य डॉ. अरु ण पाटील, डॉ. एन. बी. पवार, डॉ. विनीत रकिबे, संस्था पदाधिकारी, विभागप्रमुख, प्राध्यापक, स्पर्धक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते.

Nashik Main
Page No. 3 Feb 23, 2019
Powered by: erelego.com

पुण्य नगरी

# समाजकारण करताना राजकारण समजून घेणे महत्त्वाचे : रोहित पवार

## हिरे महाविद्यालयात राष्ट्रीय वादविवाद स्पर्धेस प्रारंभ



दिव्य मराठी

दिव्य मराठी नाशिक. शनिवार, २३ फेब्रुवारी २०१९

मंथन • रोहित पवार यांचे विद्यार्थ्यांना आवाहन ,पंचवटी महाविद्यालयात राष्ट्रीय स्तरावरील आंतरमहाविद्यालयीन वादविवाद स्पर्धेचे उद्‌घाटन

# राजकारण विकासासाठीच केल्यास बहुजनांचा उद्धार

प्रतिनिधी | नाशिक

जीवनात प्रगतीचे शिखर गाठण्यासाठी प्रत्येक क्षेत्राकडे संधी म्हणून बघायला हवे. प्रगती साधायची असेल तर बहुभाषिक विषयावर संवाद साधने महत्त्वाचे असते. समाजात जातीजातींमध्ये तेढ निर्माण होत असल्याने सलोख्याचे संबंध बिघडू लागले आहे. सामाजिक सलोखा राखण्यासाठी प्रत्येकाने जातिभेद विसरला पाहिजे. समाजकारण करताना राजकारणही समजून घेणे महत्त्वाचे असते. राजकारण जातीयवादी असेल तर सामाजिक सलोखा राखणे कठीण असते. त्यामुळे राजकारण हे केवळ विकासासाठीच केले पाहिजे, त्यातूनच बहुजनांचा उद्धार होऊ शकेल, असे प्रतिपादन बारामती अ‍ॅग्रो लिमिटेडचे कार्यकारी अधिकारी रोहित पवार यांनी केले.

पंचवटी महाविद्यालयाच्या वतीने आयोजित आंतरमहाविद्यालयीन राष्ट्रीयस्तरावरील वादविवाद स्पर्धेच्या उद्‌घाटनप्रसंगी पवार यांनी बोलत होते. यावेळी पवार बोलत होते. यावेळी संस्थेचे समन्वयक डॉ. अपूर्व हिरे, सहसचिव डॉ. व्ही. एस. मोरे, प्राचार्य डॉ. सी. जी. दिघावकर, राष्ट्रवादीचे प्रदेश सरचिटणीस अर्जुन टिळे, जिल्हाध्यक्ष पुरुषोत्तम कडलग व आकाश पगार उपस्थित होते. डॉ. अपूर्व हिरे यांनी यावेळी कर्मवीरांचा जीवनपट उलगडून सांगितला.

प्राचार्य डॉ. सी. जी. दिघावकर यांनी उपस्थित प्रमुख पाहुण्यांचे स्वागत करून प्रास्ताविक केले. या स्पर्धेसाठी देशभरातून १५० च्या आसपास स्पर्धक सहभागी झाले आहेत. पारितोषिक वितरण समारोपासाठी डॉ. विश्वंभर चौधरी, संस्थेचे सरचिटणीस डॉ. प्रशांत हिरे, समन्वयक डॉ. अपूर्व हिरे, विश्वस्त डॉ. अद्वय प्रशांत हिरे-पाटील हे उपस्थित राहणार आहेत. परीक्षा नियंत्रक म्हणून डॉ. पुरुषोत्तम काळे, डॉ. योगेश पाटील, डॉ. भास्कर डोके हे दोन दिवस काम पाहणार आहेत. डॉ. रवींद्र हिरे आणि डॉ. प्रगती मारकवार यांनी सूत्रसंचालन केले. तर आभार स्पर्धेचे समन्वयक डॉ. किरण पिंगळे यांनी मानले.

सकाळ

नाशिक, शनिवार, २३ फेब्रुवारी २०१९ ३

# जातीपातीविरहित राजकारण गरजेचे

रोहित पवार : हिरे महाविद्यालयात राष्ट्रीय वादविवाद स्पर्धेला प्रारंभ



महाराष्ट्र टाइम्स । नाशिक । शनिवार, २३ फेब्रुवारी २०१९

# हिरे महाविद्यालयात विद्यार्थ्यांना पदवी प्रदान

म. टा. वृत्तसेवा, पंचवटी



सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ व महात्मा गांधी विद्यामंदिर, नाशिक आयोजित चतुर्थ पदवीग्रहण समारंभ गुरुवारी (दि. २१) झाला. कार्यक्रमास आमदार डॉ. अपूर्व हिरे यांची प्रमुख उपस्थिती होती. संस्थेचे उपाध्यक्ष बी. के. देवरे अध्यक्षस्थानी होते.

आमदार डॉ. हिरे यांनी महात्मा गांधी विद्यामंदिर संस्थेत कौशल्याधिष्ठित ज्ञानाची कवाडे उघडी असून, त्याचा विद्यार्थ्यांनी लाभ घ्यायला हवा, असे आवाहन केले. देवरे म्हणाले की, कर्मवीर भाऊसाहेब हिरे यांनी आदिवासी, गोरगरीब, सर्वसामान्यांच्या हिताच्या दृष्टीने शिक्षणाचा पाया घातला आहे. मिरवणूक, दीप प्रजवलन आणि विद्यापीठ गीताने पदवीग्रहण समारंभाला सुरुवात झाली. संस्थेच्या एमएसजी आर्टस् अँड कॉमर्स कॉलेज मालेगाव कॅम्प, एल.व्ही. एच. आर्टस् सायन्स अँड कॉमर्स कॉलेज पंचवटी, आर्टस् सायन्स अँड कॉमर्स कॉलेज मनमाड, हरसूल, सुरगाणा, येवला, मानूर, निमगाव, मालेगाव सिटी, शिक्षणशास्त्र महाविद्यालय मालेगाव, पंचवटी मॅनेजमेंट अँड कॉम्प्युटर सायन्स, पंचवटी फार्मसी कॉलेज, एस. पी. एच. महिला महाविद्यालय मालेगाव, के. बी. एच. लॉ कॉलेज मालेगाव आदी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते पदवी प्रदान करण्यात आली. संस्थेचे सहसचिव डॉ. व्ही. एस. मोरे यांनी प्रास्ताविक केले. प्रा. मीनाक्षी पाटील यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. बापूसाहेब जगदाळे यांनी आभार मानले. सहसचिव डॉ. व्ही. एस. मोरे, सिनेट सदस्य डॉ. मोतीराम देशमुख, डॉ. नंदू पवार, विश्वस्त डॉ. प्रदीप जी. एल., दीप्ती भुतडा, सुजाता शिंदे, सत्यम पाटील, अर्चना पाटील, सी. सी. अहिरे आदी उपस्थित होते.

सकाळ

# जातीपातीविरहित राजकारण गरजेचे

## रोहित पवार : हिरे महाविद्यालयात राष्ट्रीय वादविवाद स्पर्धेला प्रारंभ

सकाळ वृत्तसेवा

पंचवटी, ता. २२ : लोकशाहीत संविधानाला खूप महत्त्व आहे. समाजकारण करताना राजकारणही समजून घेणे गरजेचे असते. राजकारण जातीवादी असेल, तर सामाजिक सलोखा राखणे कठीण होते. त्यामुळे राजकारण करताना व्यक्ती कुठल्याही पक्षाची किंवा धर्माची असेल आणि त्याचे राजकारण विकासासाठी असेल तर त्याच्या पाठीशी आपण भक्कमपणे उभे राहणे महत्त्वाचे आहे, असे पुणे जिल्हा परिषदेचे सदस्य व बारामती ॲग्रोचे मुख्य कार्यकारी अधिकारी रोहित पवार यांनी शुक्रवारी (ता. २२) येथे सांगितले.



पंचवटी : लोकनेते व्यंकटराव हिरे महाविद्यालयात वादविवाद स्पर्धेत मार्गदर्शन करताना रोहित पवार. शेजारी डॉ. अपूर्व हिरे, डॉ. व्ही. एस. मोरे, प्राचार्य डॉ. सी. जी. दिघावकर, डॉ. किरण पिंगळे, डॉ. अरुण पाटील, पुरुषोत्तम कडलग, डॉ. एन. बी. पवार, डॉ. विनीत रकिबे, आकाश पगार, बाळा निगळ आदी.

महात्मा गांधी विद्यामंदिर संचलित लोकनेते व्यंकटराव हिरे महाविद्यालयातर्फे शुक्रवारपासून दोनदिवसीय आंतरमहाविद्यालयीन राष्ट्रीय वादविवाद स्पर्धा होत असून, उद्घाटनप्रसंगी प्रमुख वक्ते म्हणून श्री. पवार बोलत होते. संस्थेचे समन्वयक डॉ. अपूर्व हिरे, सहसचिव डॉ. व्ही. एस. मोरे, प्राचार्य डॉ. सी. जी. दिघावकर, राष्ट्रवादीचे प्रदेश सरचिटणीस अर्जुन टिळे, जिल्हाध्यक्ष पुरुषोत्तम कडलग, आकाश पगार आदी उपस्थित होते.

उपस्थित स्पर्धक व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना श्री. पवार यांनी वादविवाद स्पर्धा हे सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक व राजकीय स्तरावर संवाद साधण्याचे चांगले व्यासपीठ असल्याचे सांगितले. कुठलेही क्षेत्र असो त्याकडे दुर्लक्ष न करता एक संधी म्हणून बघावे. प्रत्येक साधनांचे आहेत, तर बहुभाषिक विषयावर संवाद साधणे महत्त्वाचे असते. त्यामुळे विकासासाठी जातीभेद चालणार नाही तर एकीचा विचार व्हावा, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. कर्मवीरांनी समाजकारण करताना राजकारणाचा उपयोग विकासासाठी केला. बहुजनांच्या उद्धारासाठी त्यांनी शिक्षणक्षेत्र, सहकारक्षेत्र व कृषी क्षेत्रात मोठे काम केले. त्यामुळे आपले स्वप्न पूर्ण करायचे असेल, तर महावि… पर्याय नाही.

वादविवाद स्पर्धेचे अध्यक्ष … हिरे यांनी त्यांच्या नावाने … आयोजित केली. त्या कर्मवी… जीवनपट उलगडत आयोजना… हेतू स्पष्ट केला. प्राचार्य डॉ. दिघा… यांनी प्रास्ताविक केले. या … स्पर्धेचा हेतू कथन करून ना… महाविद्यालये विविध क्षेत्रातील ने… पुढे आणण्यात या स्पर्धेचे यो… आहे. ही स्पर्धा म्हणजे युवा पिढ… विचारांना शासन व समाज… स्तरावर पोचविण्याचे माध्यम … असेही त्यांनी या वेळी सांगि… स्पर्धेत देशभरातून दीडशे स… सहभागी झाले आहेत. शनिवारी (ता. २३) समारोप होईल.

Nashik Main
23/02/2019 Page No. 3

आपलं महानगर

# राष्ट्रीय आंतरमहाविद्यालयीन वादविवाद स्पर्धा

आडगाव ▸▸ महात्मा गांधी विद्यामंदिर संचलित, लोकनेते व्यंकटराव हिरे महाविद्यालयात आंतरमहाविद्यालयीन राष्ट्रीय वादविवाद स्पर्धेचे शुक्रवारी (२२ फेब्रुवारी) उद्घाटन झाले.

याप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून रोहित पवार, संस्थेचे समन्वयक डॉ. अपूर्व प्रशांत हिरे, सहसचिव डॉ. व्ही. एस. मोरे, प्राचार्य डॉ. सी. जी. दिघावकर, राष्ट्रवादीचे प्रदेश सरचिटणीस अर्जुन टिळे, जिल्हा अध्यक्ष पुरुषोत्तम कडलग व आकाश पगार उपस्थित होते. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सी. जी. दिघावकर यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. या स्पर्धेत देशभरातून १५० स्पर्धक सहभागी झाले आहेत. पारितोषिक वितरणसाठी डॉ. विश्वंभर चौधरी, संस्थेचे सरचिटणीस डॉ. प्रशांत हिरे, समन्वयक डॉ. अपूर्व हिरे, विश्वस्थ डॉ. अद्वय हिरे उपस्थित राहणार आहेत. डॉ. नरेंद्र देशमुख यांनी परिचय करून दिला. डॉ. पुरुषोत्तम काळे, डॉ. योगेश पाटील, डॉ. भास्कर डोके परीक्षक आहेत. डॉ. रवींद्र हिरे आणि डॉ. प्रगती मारकवार यांनी सूत्रसंचालन केले, तर आभार स्पर्धेचे समन्वयक डॉ. किरण पिंगळे यांनी मानले. याप्रसंगी उपप्राचार्य डॉ. अरुण पाटील, डॉ. एन. बी. पवार, डॉ. विनीत रकिबे, प्राचार्य व स्पर्धक उपस्थित होते.

Nashik Edition
23 Feb, 2019 Page No. 5
Powered by : eReleGo.com

# रस्ता सुरक्षेसाठी जीवनदूत ही काळाची गरज : भरत कळसकर

■ पंचवटी । दि.७ वार्ताहर

येथील हिरे महाविद्यालयात ३० व्या राष्ट्रीय रस्ता सुरक्षा अभियानानिमित्त नाशिक प्रादेशिक परिवहन अधिकारी भरत कळसकर, शहर वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक रमेश काशिद यांच्या प्रमुख उपस्थितीत व प्राचार्य डॉ. सी. जी. दिघावकर यांच्या अध्यक्षतेखाली रस्ता सुरक्षा अभियानावर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.



हिरे महाविद्यालयात रस्ता सुरक्षा अभियानप्रसंगी मार्गदर्शन करतांना प्रादेशिक परिवहन अधिकारी भरत कळसकर, समवेत डॉ. सी. जी. दिघावकर, पोलीस निरीक्षक रमेश काशिद, डॉ. अरुण पाटील, डॉ. विनीत रकीबे, प्रा. रवी वाघचौरे.

प्रादेशिक परिवहन अधिकारी भरत कळसकर यांनी रस्ते सुरक्षा या विषयाचे महत्त्व पटवून देताना सुरवातीला एक गाणे गायले. रस्ता अपघातांची कारणे, अपघातांचे प्रकार व अपघातांची ठिकाणे, अपघातांची वेळ, अपघातांची कारणे या विषयावर त्यांनी सखोल मार्गदर्शन केले. सर्व विद्यार्थ्यांना आपली सुरक्षा किती महत्त्वाची आहे, हे पटवून दिले. आपल्या आरोग्य व सुरक्षेकडे डोळस नजरेने बघितले तर आपले आपण व्यवस्थित राहू शकतो. मूलभूत गोष्टीकडे लक्ष दिले नाहीतर मोठे नुकसान होऊ शकते. रस्त्यावरून प्रवास करतांना मोबाईलचा वापर टाळणे, लेन कटींग, अतिवेगाने वाहन चालविणे टाळावे, रस्त्यावर गप्पा टाळणे अशा छोट्या छोट्या गोष्टी आपण टाळू शकतो. सीट बेल्टचा वापर करणे, हेल्मेटचा वापर करणे, लक्षपूर्वक वाहन चालविणे अशा अनेक गोष्टी यावेळी कळसकर यांनी सांगितल्या.

पोलीस निरीक्षक रमेश काशिद यांनीही मार्गदर्शन केले. प्राचार्य सी. जी. दिघावकर यांनी उपस्थित पाहुण्यांचे स्वागत केले. याप्रसंगी उपप्राचार्य डॉ. अे. व्ही. पाटील, प्रा. रवी वाघचौरे, प्रा. एस. पी. ब्याळी व पत्रकार दिनेश बच्छाव यांनी सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन वाणिज्य शाखा प्रमुख डॉ. विनीत रकिबे यांनी केले. याप्रसंगी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पंचवटी महाविद्यालयात विद्यार्थी गुणगौरव

नाशिक ▶▶ विद्यार्थ्यांनी प्रसार माध्यमांच्या सकारात्मक उर्जेचा उपयोग समाजाच्या विकासासाठी करावा. सायबर क्राईमच्या समस्या युवकांनी स्वत: निर्माण केलेल्या अडचणी आहेत. त्यातून बाहेर पडण्यासाठी विद्यार्थ्यांनी स्पर्धा परीक्षांचा अभ्यास करावा, खेळाडू व्हावे, माहिती तंत्रज्ञानात निपुण व्हावे, असे प्रतिपादन पोलीस उपायुक्त लक्ष्मीकांत पाटील यांनी केले. पंचवटीतील लोकनेते व्यंकटराव हिरे कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात वार्षिक स्नेहसंमेलन व पारितोषिक वितरण कार्यक्रम झाला. यावेळी उपायुक्त लक्ष्मीकांत पाटील बोलत होते. वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुरज बिजली, पोलीस उपायुक्त माधुरी कांगणे, विश्वस्त संपदा हिरे, कुलसचिव राजेश शिंदे, प्राचार्य डॉ. सी. जी. दिघावकर आदी उपस्थित होते. कांगणे म्हणाल्या, प्रत्येक विद्यार्थ्याची दिवसाची सुरुवात फेसबुक, व्हॉट्सअॅप, इंटरनेटने सुरू होते. आधुनिक तंत्रज्ञानाने सुखसुविधा वाढल्या असल्या तरी एकमेकांमधील संवाद, संपर्क व जिव्हाळा कमी झाला आहे. यावेळी डॉ. के. टी. खैरनार, प्रा. व्ही. व्ही. सोनवणे, प्रा. रविंद्र वाघचौरे, एस. पी. सूर्यवंशी, उपप्राचार्य डॉ. अे. व्ही. पाटील, डॉ. एन. बी. पवार, प्रा. जे. एन. सोनवणे, प्रा. सुचेता सोनवणे आदी उपस्थित होते. हिरे महाविद्यालयातर्फे दरवर्षी पंचवटी रत्न पुरस्काराने सन्मानित केले जाते. या वर्षीचा पुरस्कार महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी व नाशिकचे सिने व नाट्य कलावंत अरुण इंगळे यांना प्रदान करण्यात आला.

# सोशल मीडियाचा अतिरेकी वापर नको : लक्ष्मी

## लोकनेते हिरे महाविद्यालयाचे स्नेहसंमेलन उत्साहात, खेळाडूंसह विविध गुणवं

■ कोणार्कनगर । दि.३ वार्ताहर

महात्मा गांधी विद्यामंदिर संचलित, लोकनेते व्यंकटराव हिरे कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात वार्षिक स्नेहसंमेलन व परितोषिक वितरण सोहळा संपन्न झाला. या सोहळ्यासाठी पोलीस उपायुक्त लक्ष्मीकांत पाटील, आडगाव वरिष्ठ पोलिस निरीक्षक सूरज बिजली प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.



स्नेहसंमेलनाच्या उद्घाटनप्रसंगी बोलताना पोलीस उपायुक्त लक्ष्मीकांत पाटील. समवेत प्राचार्य डॉ. सी. जी. दिघावकर, डॉ. के. टी. खैरनार, व्ही. व्ही. सोनवणे, रवींद्र वाघचौरे, एस. पी. सूर्यवंशी, उपप्राचार्य डॉ. अे. व्ही. पाटील, डॉ. एन. बी. पवार, जे. एन. सोनवणे, सुचेता सोनवणे, डॉ. विनीत रकिबे आदि मान्यवर.

लक्ष्मीकांत पाटील म्हणाले, की महात्मा गांधी विद्यामंदीर संस्थेचे कार्य व्यापक आणि आगळेवेगळे आहे. विद्यार्थ्यांनी प्रसारमाध्यमांच्या सकारात्मक उर्जेचा उपयोग समाजपयोगी कामासाठी करावा. मी पोलीस आयुक्त झालो ते प्रचंड मेहनतीने आमची पिढी सोशल मिडीयामध्ये अडकलेली नव्हती. आज सायबर क्राईमच्या समस्या या युवकांनी स्वत: निर्माण केलेल्या अडचणी आहेत. त्यातून बाहेर या स्पर्धात्मक युगात स्पर्धा परीक्षाचा अभ्यास करा, खेळाडू व्हा.

संस्थेचे विश्वस्त संपदा हिरे, प्रमुख पाहुणे म्हणून पोलीस उपायुक्त माधुरी कांगणे, प्राचार्य डॉ. सी. जी. दिघावकर, कुलसचिव राजेश शिंदे यांच्या उपस्थितीत पारितोषिक वितरण झाले.

स्नेहसंमेलन अध्यक्ष डॉ. के. टी. खैरनार, व्ही. व्ही. सोनवणे, रवींद्र वाघचौरे, एस. पी. सूर्यवंशी, उपप्राचार्य डॉ. अे. व्ही. पाटील, विज्ञान शाखा प्रमुख डॉ. एन. बी. पवार, उपप्राचार्य जे. एन. सोनवणे, पर्यवेक्षिका सुचेता सोनवणे, महाविद्यालय विकास समितीचे सर्व सदस्य, विभाग प्रमुख प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते.

सूत्रसंचालन किशोर निकम, प्रगती मारकवार व कुणाल वाघ यांनी केले. पारितोषिक वितरणाचे वाचन ग्रंथपाल संभाजी व्याळीज यांनी केले. डॉ. आर. पी. हिरे व वसंधुरा जाधव यांनी आभार मानले.

### लोकप्रियतेच

प्रत्येक विद्यार्थ्यांची
इंटरनेटने होते. आधु
संपर्क, जिव्हाळा कम
इंटरनेटच्या जाळ्यात
सहानुभूतिच्या मृगज
अनोळखी व्यक्तीशी ह
भावनांत प्रत्येक जण
सेल्फीतून लोकप्रियते
मानसिकता ढासळत

### अरुण इंगळें

महाविद्यालयाच्या वती
कामगिरी करणाऱ्या व्य
केले जाते.या वर्षीचा ह
व नाशिकचे सिने व ना
करण्यात आला.




पंचवटी : लोकनेते व्यंकटराव हिरे महाविद्यालयाच्या स्नेहसंमेलन उद्घाटनप्रसंगी शनिवारी मार्गदर्श उपायुक्त लक्ष्मीकांत पाटील. शेजारी प्राचार्य डॉ. सी. जी. दिघावकर, डॉ. के. टी. खैरनार, प्रा. रवींद्र एस. पी. सूर्यवंशी, डॉ. ए. व्ही. पाटील आदी.

# सोशल मीडियाचा वापर समाज विकासासाठी व्हावा : श्री. पाटी

**सकाळ वृत्तसेवा**

पंचवटी, ता. २ : आजच्या स्पर्धेच्या युगात विद्यार्थ्यांनी दैनंदिन अभ्यासाबरोबरच स्पर्धात्मक परीक्षांचाही अभ्यास करावा. आजची पिढी सोशल मीडियाच्या अतिवापरात गुंतून पडल्याने काही अडचणी निर्माण झाल्या आहेत. खरंतर सोशल मीडियाचा वापर समाजाच्या विकासासाठी व्हावा, अशी अपेक्षा पोलिस उपायुक्त लक्ष्मीकांत पाटील यांनी शनिवारी (ता.२) व्यक्त केली.

महात्मा गांधी विद्यामंदिर संचालित लोकनेते व्यंकटराव हिरे कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात वार्षिक स्नेहसंमेलन व परितोषिक वितरण सोहळा झाला. यांसाठी श्री. पाटील, आडगाव पोलिस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक सुरज बिजली प्रमुख पाहुणे होते.

श्री. पाटील म्हणाले, की मी पोलिस उपायुक्त झालो ते प्रचंड मेहनतीने. आमची पिढी सोशल मीडियामध्ये अडकलेली नव्हती. आज सायबर क्राइमच्या समस्या या युवकांनी स्वत: निर्माण केलेल्या अडचणी आहेत. त्यातून बाहेर या. स्पर्धात्मक युगात स्पर्धा परीक्षाचा अभ्यास करा. खेळाडू व्हा, माहिती तंत्रज्ञानात मोठे व्हा. प्राचार्य डॉ. सी. जी. दिघावकर यांनी प्रमुख स्वागत केले.

सांस्कृतिक क अध्यक्षा महात्मा गांधी संस्थेच्या विश्वस्त संपदा पाहुण्या पोलिस उपायु कांगणे व विश्वस्त व राजेश शिंदे याच्या पारितोषिक वितरण इ कांगणे यांनी मनोगत व्यक्त किशोर निकम, प्रा. प्रगत व प्रा. कुणाल वाघ यांनी केले. पारितोषिक वितरण ग्रंथपाल प्रा. संभाजी ह्या केले. डॉ. आर. पी. वसंधुरा जाधव याने आभा

अशातच २१ डिसेंबर



## पंचवटी कॉलेज

एमजीव्ही पंचवटी कॉलेजमध्ये
माहोल रंगला आहे. या कॅम्पस
मिसमॅच डे, कॅप डे अशा संक
करण्यात विद्यार्थ्यांचा उत्साह





lokmat Times

# Mother is the source of Value Education:Dr Kulkarni




MGV's Loknete Vyankatrao Hiray College, Panchavati, Nashik organised a two-day International Conference on 'Innovations in Teaching, Learning and Evaluation in Higher Education' on 23rd and 24 January 2019. The inauguration was done by the chief guest Dr. Omprakash Kulkarni. "Mother is the first Teacher, and the source of value education in life. The role of the teacher has changed drastically in the world of globalization. The teacher has to play the role not only of a good teacher but also of a loving and caring mother, mentor and guide", he said in the inaugural speech. "To educate is to find the hidden talent of the student and nurture it to blossom and flourish. Teaching our life have changed and education in not an exception, therefore teaching should be more innovative and interesting to overcome these challenges". "Teaching should be more fruitful, student-centric and stand the test of time. Teaching, Learning and Evaluation is the backbone of any education system. The role of the teacher is to fulfill the educational demands of the students who come from various

## COLLEGE BUZZ

cultural, social and economical backgrounds. Quality education for all should be the aim and objective of educational institutions and teachers", he added further.

Principal Dr. C G

the sustainable devel ment of the educatio field. This will help to bu a healthy society and ev tually a strong nation."

In his introduct speech the coordinator the conference Dr. T Pawar said "The aim this conference is explore new innovat pedagogical methods t should be incorporated meet the academic need the students. The delibe tions in the confere would bring about ma innovative perspecti that would lead to the w fare of student commun in particular and hum society at large".

Vice-principal and c vener of the conference A V Patil introduced chief guest and resou persons to the delega and participants.

# مختصر خبریں

## یوم جمہوریہ کی تقریب میں ناسک کی ندھی مہاراشٹر کی نمائندگی کیلئے منتخب



ندھی باجی راؤ دیورے

**ناسک** (مختار عدیل): دارالحکومت دہلی میں یوم جمہوریہ کی مناسبت سے ہونے والی تقریب میں مہاراشٹر سے نمائندگی کرنے کیلئے ندھی باجی راؤ دیورے کا انتخاب عمل میں آیا ہے۔ یہ طالبہ ایم جی وِدیا مندر ٹرسٹ کے زیرانصرام جاری وینکٹ راؤ ہیرے جونیئر کالج (ناسک) میں زیر تعلیم ہے۔ اس ضمن میں مہاراشٹر بٹالین (۷) کے صوبیدار افضل پاشا اور کمانڈنگ آفیسر کشواہا کے ذریعے ندھی کا انتخاب عمل میں آیا ہے۔ یوم جمہوریہ کو مہاراشٹر بٹالین (۷) میں ندھی اپنے فن کا مظاہرہ دہلی کے راج پتھ پر ہونے والی تقریبات کے دوران کرے گی۔ اس

आपले संशोधन सातत्याने पुढे सहकार्य मिळाले.

# भूगोल सामान्यज्ञान परीक्षेत विद्यार्थ्य

प्रतिनिधी । नाशिक

पृथ्वीवरील भौतिक व मानवी पर्यावरणातील रचना, क्रिया व आंतरक्रिया यांचा अभ्यास म्हणजे भूगोल. भूगोलात पर्यावरणाचे व्यवस्थापन, विविध संसाधन स्त्रोताचे जतन व संवर्धन यांचा समावेश होतो. प्रत्यक्ष क्षेत्र निरीक्षण, नकाशे यांना भूगोलात महत्वाचे स्थान आहेच. परंतु, सध्या दूर संवेदी कृत्रिम उपग्रहाचा वापर, हवाई छायाचित्रण तसेच भौगोलिक माहिती प्रणाली यांनी भूगोलाच्या निरीक्षण क्षमतेत क्रांतिकारक भर घातला आहे. त्यामुळे बदलत्या युगात भूगोल अभ्यासाचे महत्व अनन्यसाधारण आहे, असे प्रतिपादन प्राचार्य डॉ सी. जी. दिघावकर यांनी केले.

पंचवटी महाविद्यालयात भूगोल विभागांतर्गत




आयोजित सामान्यज्ञान स्पर्धा परीक्षेच्या पारितोषिक वितरण समारंभप्रसंगी ते बोलत होते. या परीक्षेत महाविद्यालयातील एकूण १६८ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला होता. वरिष्ठ महाविद्यालय गटातून प्रथम

पारितो
मिळाल
स्वप्नी
प्रमाण



**पंचवटी : पहिलवान बाळू बोडके याचा सत्कार व**
**हिरे व प्राचार्य डॉ. दिघावकर. शेजारी डॉ. ए. व्ही**
**पवार, डॉ. विनीत रकिबे, क्रीडा संचालक डॉ.**
**किशोर राजगुरू, प्रा. रोशनी गुजराथी व विद्यार्थी**

# आंतरविद्यापीठ स्पर्धेत बोडकेला

पंचवटी : लोकनेते व्यंकटराव हिरे महाविद्यालयाचा बाळू
भारतीय आंतरविद्यापीठ कुस्ती स्पर्धेत फ्रीस्टाइल प्रकारात
पटकावले. आर्थिक स्थिती जेमतेम असल्याने डॉ. अपूर्व
घेतल्याने यश संपादन करू शकलो, असे बाळूने स्पष्ट केले
होणाऱ्या जागतिक आंतरविद्यापीठ कुस्ती स्पर्धेसाठी निवड
विदेशात भारत व नाशिकचे नावलौकिक करण्याचा मानस



पंचवटी : महात्मा गांधी विद्यामंदिर संस्थेचे सहसचिव डॉ. व्ही. एस. मोरे यांचा सत्कार करताना प्राचार्य डॉ. सी. जी. दिघावकर. समवेत डॉ. ए. व्ही. पाटील, डॉ. विनीत रकिबे, डॉ. एन. बी. पवार, प्रा. पी. डी. झाल्से आदी.

# समाज सुधारल्यावरच आपली प्रगती

## डॉ. मोरे; लोकनेते व्यंकटराव हिरे महाविद्यालयात सत्कार

पंचवटी, ता. ४ : आयुष्यात वेगवेगळ्या टप्प्यावर मदत करणाऱ्यांप्रति कृतज्ञता ठेवा व जमेल तशी परतफेड करा. कष्ट करण्याची सवय लावून स्वावलंबी बना. कारण समाज सुधारल्याशिवाय प्रगती होणार नाही. परिश्रम, प्रामाणिकपणा व नम्रपणा असेल तर कुठलीही गोष्ट साध्य करता येऊ शकते, असे प्रतिपादन महात्मा गांधी विद्यामंदिर संस्थेचे सहसचिव डॉ. व्ही. एस. मोरे यांनी मंगळवारी (ता. ४) केले.

लोकनेते व्यंकटराव हिरे कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात डॉ. व्ही. एस. मोरे यांचा गौरव झाला. त्या वेळी सत्काराला उत्तर देताना ते बोलत होते.

लंडनच्या एनआरआय सोसायटी ऑफ इंडिया संस्थेतर्फे हाउस ऑफ कॉमन्स सभागृहात नुकताच श्री. मोरे यांना 'महात्मा गांधी सन्मान' पुरस्काराने सन्मानित केले. त्याबद्दल त्यांचा सत्कार झाला. डॉ. मोरे यांनी जुन्या आठवणींना उजाळा देऊन त्यांचा सुरवातीचा प्रवास किती खडतर होता, याची जाणीव उपस्थितांना करून दिली. प्राचार्य डॉ. सी. जी. दिघावकर यांनी प्रास्ताविक करून पाहुण्याचा परिचय करून दिला. डॉ. मोरे माझे आदर्श आहेत, एक रोलमॉडेल आहेत, असे गौरवोद्गार डॉ. दिघावकर यांनी या वेळी काढले. डॉ. एन. बी. पवार, कनिष्ठ विभागाचे उपप्राचार्य प्रा. पी. डी झाल्से, पर्यवेक्षिका सुचिता सोनवणे, उपप्राचार्य प्रा. जे. एन. सोनवणे, प्रा. एस. जे. पाटील उपस्थित होते. डॉ. विनीत रकिबे यांनी सूत्रसंचालन केले. उपप्राचार्य डॉ. ए. व्ही. पाटील यांनी आभार मानले.

**पुण्य नगरी**

# आरोग्याविषयी जागरूक असणे आवश्यक : डॉ. अपूर्व हिरे

सातपूर : दैनंदिन व्यग्र जीवनात आरोग्याकडे लक्ष न दिल्यास कोणत्याही आजाराचे आक्रमण आपल्यावर होऊ शकते. त्यामुळे आरोग्याकडे दुर्लक्ष न करता, वेळीच डॉक्टरांचा सल्ला व उपचार घेतल्यास भविष्यात आपले आरोग्य सुदृढ राहण्यास निश्चित मदत होऊ शकते, या अनुषंगाने आपल्या आरोग्याविषयी जागरूक असणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन माजी आ. डॉ. अपूर्व हिरे यांनी केले.



कामगारनगर, सातपूर येथे डॉ. अपूर्व हिरे मित्र मंडळ व एका खासगी रुग्णालयातर्फे आयोजित आरोग्य तपासणी शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर नाशिक जिल्हा महिला विकास सहकारी बँकेच्या अध्यक्षा डॉ. योगिता हिरे, डॉ. मनोज चोपडा आदी उपस्थित होते. डॉ. मनोज चोपडा यांनी विविध प्रकारच्या आजारांपासून प्रतिबंधात्मक काळजी, उपाययोजना याबाबत मार्गदर्शन केले. या वेळी चारशेहून अधिक नागरिकांनी शिबिराचा लाभ घेतला. या प्रसंगी प्रभाकर शिंदे, सुमन शिंदे, शैला महाले, पुष्पा ठाकरे, सिंधू इंगळे, पोपटराव कोल्हे, चंद्रकांत ठाकरे, भिलाजी मढे, रामदास चव्हाण, तुकाराम शिंदे, प्रभाकर अपसुंदे, आनंदा कोल्हे, मीनाक्षी गायकवाड, शुभांगी आवारे यांच्यासह परिसरातील नागरिक व महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते. पी. बी. नरवाडे यांनी सूत्रसंचालन केले, तर एस. जी. अहिरे यांनी आभार मानले.

# कर्मवीर भाऊसाहेब हिरे स्वातंत्र्य संग्रामातील संघर्षयात्री

## प्राचार्य डॉ. चंद्रकांत दिघावकर यांचे प्रतिपादन

प्रतिनिधी । नाशिक

महात्मा गांधी विद्यामंदिर संचलित लोकनेते व्यंकटराव हिरे महाविद्यालयात कर्मवीर भाऊसाहेब हिरे यांच्या स्मृतीस अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रकांत दिघावकर यांनी कर्मवीरांच्या सर्वांगीण कार्याची माहिती उपस्थितांना दिली.

ते म्हणाले की, आज २१ व्या शतकात भारत महासत्ता होण्याचे स्वप्न पहात आहोत. पण आजचा हा दिवस उजाडण्यासाठी अनेक हुतात्म्यांनी रात्रीचा दिवस केला आहे. प्राणांची आहुती दिली आहे. समाजासाठी आणि राष्ट्र उभारणीसाठी अहोरात्र संघर्ष केला आहे. त्यातीलच एक संघर्षयात्री म्हणजे कर्मवीर भाऊसाहेब हिरे हे होय. शिक्षण, सहकार, समाजकारण, कृषि, राजकारण अशा अनेक क्षेत्रांत भाऊसाहेब हिरे समाजाच्या विकासासाठी लढले, असेही प्राचार्य डॉ. दिघावकर म्हणाले.

महात्मा गांधी विद्यामंदिर व आदिवासी सेवा समिती या संस्थांच्या उभारणीतून हजारो आदिवासी, वंचित, गोर गरीबांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्याचे [illegible] यावेळी दिघावकर यांनी सांगितले. महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. अरुण पाटील, विज्ञान शाखाप्रमुख डॉ. एन. बी. पवार, कला व वाणिज्य शाखाप्रमुख डॉ. विनीत रकिबे आदि व्यासपीठावर उपस्थित होते. महाविद्यालयातील प्रा. डॉ. नरेंद्र देशमुख यांची सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या मानसशास्त्र अभ्यास मंडळावर अध्यक्ष म्हणून निवड झाली. त्याबद्दल त्यांचा महाविद्यालयाच्या वतीने सत्कार करण्यात आला. याप्रसंगी महाविद्यालयातील सर्व विभाग प्रमुख, प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित राहून त्यांनी कर्मवीरांच्या प्रतिमेचे पूजन केले.

# नाशिक शहर




पंचवटी : लोकनेते व्यंकटराव हिरे महाविद्यालयात बुधवारी 'इनोवेशन्स इन टीचिंग लर्निंग अँन्ड इवेलुएशन इन हॉयर एज्युकेशन' या विषयावर मार्गदर्शन करताना डॉ. ओमप्रकाश कुलकर्णी. शेजारी श्री. के. देवरे, प्रा. डॉ. गलुह डि. अजेन, प्रा. डॉ. अब्दुलअझिझ अहमद मोहम्मद अहमद, प्रा. डॉ. एक्सँडरो मॅक्सिमिलियन, प्रा. डॉ. व्ही. आर. शिंदे, डॉ. सी. जी. दिघावकर, डॉ. अरुणा पाटील आदी.

# उच्चशिक्षणाची धोरणे बदलण्याची गरज

## डॉ. कुलकर्णी : हिरे महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय परिषदेचे उद्घाटन

सकाळ वृत्तसेवा

**पंचवटी, ता. २३ : उच्चशिक्षणाच्या क्षेत्रातील विशेषतः अध्ययन, अध्यापन व परीक्षण अधिक प्रभावी होण्यासाठी आणि उच्चशिक्षणात होत असलेल्या बदलांना सामोरे जाण्यासाठी मूल्याधिष्ठित शिक्षणपद्धती विकसित करणे आवश्यक असते. शिक्षणशास्त्रज्ञांनी त्या दृष्टीने उच्चशिक्षणाची धोरणे विकसित करण्यास प्राधान्य देण्याची गरज असल्याचे प्रतिपादन प्रसिद्ध वैज्ञानिक सल्लागार, तज्ज्ञ अभियंता प्रा. डॉ. ओमप्रकाश कुलकर्णी यांनी केले.**

महात्मा गांधी विद्यामंदिर संचलित, लोकनेते व्यंकटराव हिरे कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पुरस्कृत 'इनोवेशन्स इन टीचिंग लर्निंग अँन्ड इवेलुएशन इन हॉयर एज्युकेशन' या विषयावर दोनदिवसीय आंतरराष्ट्रीय परिषदेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. महात्मा गांधी विद्यामंदिर संस्थेचे उपाध्यक्ष श्री. के. देवरे अध्यक्षस्थानी होते.

डॉ. कुलकर्णी म्हणाले, की उच्चशिक्षणात मूल्यवर्धन अत्यावश्यक आहे. विद्यार्थ्यांचे सुगुण विकसित करणे म्हणजे शिक्षण होय. शिक्षकांनी निःस्पृह राहायला पाहिजे. शिवाजी महाराजांच्या अभ्यासातून अनेक गुणांचा अभ्यास करता येतो. त्या दृष्टीने शिक्षणसंस्थांनी आपले व्हीजन, मिशन आणि गोल यांमध्ये आमूलाग्र बदल करणे आणि त्यांमध्ये मूल्यांचा निर्देश करणे काळाची गरज आहे.

अध्यक्षीय मनोगतात श्री. देवरे यांनी उच्चशिक्षणात होत असलेल्या बदलांचा मागोवा घेतला. 'दर्जेदार शिक्षण' आणि 'बहुजनांसाठी शिक्षण' या ध्येयाने संस्था मार्गक्रमण करीत असल्याचे त्यांनी सांगितले. प्राचार्य डॉ. सी. जी. दिघावकर यांनी देश-विदेशातून आलेल्या सर्व संशोधक, मार्गदर्शकांचे स्वागत केले. समन्वयक डॉ. टी. बी. पवार यांनी प्रास्ताविक केले. चर्चासत्राचे संयोजक डॉ. अरुणा पाटील यांनी प्रमुख पाहुण्यांचा परिचय करून दिला. चर्चासत्रासाठी देश-विदेशातून ८३ शोधनिबंध आले असून, त्यांचा समावेश असलेल्या शोधपत्रिकेचे प्रकाशनही या वेळी झाले.

चर्चासत्रासाठी प्रा. डॉ. गलुह डि. अजेन (इंडोनेशिया), प्रा. डॉ. अब्दुलअझिझ अहमद मोहम्मद अहमद (येमेन), प्रा. डॉ. एक्सँडरो मॅक्सिमिलियन (इंडोनेशिया), प्रा. डॉ. व्ही. आर. शिंदे (पुणे विद्यापीठ) व प्राचार्य डॉ. हिरे असे आंतरराष्ट्रीय ख्यातकीर्त व्याख्याते, संशोधक, मार्गदर्शक उपस्थित होते.

या आंतरराष्ट्रीय चर्चासत्रास विज्ञान शाखाप्रमुख डॉ. एस. बी. पवार उपस्थित होते. डॉ. रेशम मल्ला यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. किशोर रकिबे यांनी आभार मानले. दोनदिवसीय परिषदेचा गुरुवारी (ता. २४) समारोप होईल.